# डोन्ट वरी बी हॅपी...

दोन अंकी नाटक

**प्रल्हाद जाधव**

पात्र संयोजन :

१. विक्रम महाले (३०)

२. दयानंद हांडे (४५)

३. संदीप पेंडसे (३५)

४. वैशाली ठाकूर (४०)

५. राजदीप गांगुली (५५)

६. प्रसाद काळे (२२)

७. ईश्वर पटेल (५०)

८. साधना ठाकूर (२१)

अंक पहिला : प्रवेश पहिला.

(टायटल साँग वाजत आहे.)

मंत्र सुखाचा, आयुष्याचा
आपुल्याच हाती...
नकोच टेन्शन, वा डिप्रेशन
नको कशाची भीती, डोन्ट वरी बी हॅपी ...
जगणे म्हणजे, सुरेल गाणे
सुख दु:खाचे धुंद तराणे
चला भिडूया आव्हानांना
करुया थोडी मस्ती, डोन्ट वरी बी हॅपी ...
जोश नवा हा, नवीन वारे
नव्या युगाचे, नवीन नारे
चला पकडूया सुपरफास्ट ही
नव्या फलाटावरची, डोन्ट वरी बी हॅपी.....

(पडदा उघडतो. मुंबईतील गिरगावमधील सायबर क्राईम पोलिस स्थानक. इतर पोलिस स्थानकं असतात तशीच सर्वसाधारण रचना. मागच्या भिंतीवर मधोमध एक मोठा एलसीडी स्क्रीन. त्यावर आवश्यक तेव्हा विविध वाहिन्यांवरील बातम्या, अन्य चित्रीकरण दिसते. तो पडदा संगणकाला जोडलेला असल्यामुळे इंटरनेटचे प्रोजेक्शनही त्यावर दिसू शकते. एकीकडच्या टेबलावर रांगेत संगणकाचे चार संच, कोपऱ्यात व्हीसीआर, एलसीडी प्रोजेक्टर, मोठा स्वीच बोर्ड, इन्स्पेक्टरची टेबल-खुर्ची. दुसरीकडे उपनिरीक्षकाचे टेबल, दोन खुर्च्या. दोन आडवी बाकडी. हवालदारांसाठी खुर्च्या-टेबले. तिथेच वर एक छोटा देव्हारा. एका बाजूला छोटी कस्टडी. कष्टडीत भिंतीला लागून एक कठडा. कष्टडीला एक गजांचा दरवाजा. तो बंद करून बाहेरून कुलुप घालता येतं. पडदा उघडतो. पोलिस सब-इन्स्पेक्टर महाले अंधारातच रिमोटची बटनं दाबत एकेका चॅनलच्या बातम्या पाहात आहे.)

बातमी १:
(मधूनच बातमी सुरू होते. निवेदक दिसत आहे) ...राष्ट्रीय बँकेच्या ग्राहकांना लुबाडण्यात येत असल्याची तक्रार पुण्याचे आमदार डॉ. संतोष परूळेकर यांनी आज पाषाण येथील पोलिस स्टेशनात केली. ऑन लाईन बँकिंग हे केवळ एक फॅड असल्याचं त्यांनी आपल्या तक्रारीत म्हटलं आहे. या पद्धतीमुळे ग्राहकांची सिक्रेट माहिती हॅकर्सना मिळत असून त्यामुळेच अनेक ग्राहकांच्या खात्यातून त्यांच्या डिपॉझिट्मधल्या रकमा गायब होत आहेत, असं त्यांनी पुढं म्हटलं आहे. आमदार परुळेकर यांच्या खात्यातून गेल्या आठवड्यात दीड लाख रुपयांची रक्कम एकाएकी गायब झाल्याचं त्यांना आढळून आल्यानं त्यांनी ही तक्रार केली आहे. सायबर गुन्हेगारी रोखण्यात शासनाला

पूर्णपणे अपयश आलं असून येत्या अधिवेशनात आपण सरकारला काम करू देणार नाही अशी स्पष्टोक्ती याप्रकरणी प्रतिक्रिया देताना विरोधी पक्ष नेता श्रीयुत -

बातमी २ :
नागपुरातील मेयो महाविद्यालयातील एका विद्यार्थीनीचे तिच्या नकळत काढलेले फोटो इंटरनेटवर टाकून तिची बदनामी करण्यात आल्याची तक्रार तिच्या पालकांनी आज धंतोली पोलिस स्टेशनात केली. या घटनेस सहा दिवस होऊनही आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आलेले नाही यावरून सायबर पोलिसिंगच्या मर्यादाच स्पष्ट झाल्या आहेत असं जाणकारांचं म्हणणं आहे... सदरहू विद्यार्थिनीचा फोटो, अन्यत्र उपलब्ध असणाऱ्या नग्न स्त्रीच्या फोटोवर सुपरइंपोज करून तिची नग्न छायाचित्रं काढल्याचं भासवण्यात आलं आहे. हा अत्यंत मनस्तापदायक प्रकार असून गुन्हेगारांना कडक शासन झालं पाहिजे अशी मागणी त्या विद्यार्थिनीच्या पालकांनी  केली आहे.... या प्रकरणी-

बातमी ३:
सायबर गुन्हेगारी हा वाढत्या सामाजिक चिंतेचा विषय ठरला असून या दृष्टीनं शासनानं तातडीच्या उपाययोजना आखल्या पाहिजेत असा निष्कर्ष नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या परिसंवादात काढण्यात आला. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ लेखक डॉ. अच्युत परांजपे या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होते. नाशिक येथील पोलिस प्रशिक्षण महाविद्यालयात झालेल्या या परि-

बातमी ४:
मुंबईतील ए.टी.एम. लुटीची मालिका अखंडितपणे सुरूच असून आज पुन्हा बोरीवलीत एका ए.टी.एम.मधून पंधरा लाख रुपये लंपास करण्याचा प्रकार उघडकीस आला. पत्रकारांनी पोलिस आयुक्त श्री. सत्यजित गांगुली यांची भेट घेतली असता तपास सुरू असल्याचं नेहमीचं उत्तर त्यांनी दिलं. एकूणच पोलीस डिपार्टमेंटच्या गलथान कारभारावर जनता नाराज असल्याचे चित्र दिसत आहे.

(फोन वाजू लागतो, महाले टीव्ही बंद करतो आणि फोन उचलतो. तोवर स्वच्छ प्रकाश. आता पोलिस स्टेशन नीट नजरेत भरत आहे.)

महाले : नमस्कार, 'सायबर क्राईम पोलिस स्टेशन' मधनं पी. एस. आय. विक्रम महाले बोलतोय... बोला... हं, हं... काय? अरेरे... च्... च्... बरं... बरं? चाळीस हजार? तुम्ही असं करा, विक्रम महाले ॲट रिडिफमेल डॉट कॉम वर एक कंप्लेंट नोंदवा... डिटेल द्या सर्व त्यात... साहेब येतील आता. पाठवतील कुणालातरी! पी. एस. आय. परदेशी म्हणून आहेत ते येतील, नाहीतर मी येईन... काळजी करू नका... (पुन्हा पत्ता सांगत) विक्रम महाले ॲट रिडिफमेल डॉट कॉम, ओके? (फोन ठेवतो.) चॅयला ह्यांच्या... गेल्या दोन महिन्यातली चौथी केस आहे ही. कसं काम करावं? स्टाफपण देत नाही गव्हर्नमेंट....(एक संगणक सुरू करतो, की-बोर्डवरची बटने दाबत आपलं ई-मेल अकाऊंट ओपन करतो. पडद्यावर चित्र नीट उमटतायत की नाही याची खात्री करून घेतो. मग आलेल्या मेल चेक करत

बसतो. हलकंसं संगीत. इतक्यात एक हवालदार आत येतो, हा हांडे. हातात पोलिसांकडे असते ती वेताची टिपिकल काठी. महालेपेक्षा वयाने मोठा. वय सुमारे ४५ वर्षे.)

हांडे : (सॅल्यूट करून ओळख देत) नमस्कार सर, मी हांडे.

महाले : नमस्कार, नमस्कार! आज जॉईन व्हायला येणार तू हे समजलं होतं... (स्वत:ची ओळख करून देत) मी पी.एस.आय. महाले.

हांडे : हो सर, माहिताय.

महाले : साहेब विचारत होते काल, नवीन हवालदार कधी येणार म्हणून!

हांडे : कोण साहेब?

महाले : पेंडसेसाहेब. आपले सिनीअर पी.आय.

हांडे : हां, हां. कसा काय माणूस हाय सोभावाला?

महाले : एकदम कडक आहेत जरा सांभाळून!

हांडे : बापरे!

महाले : शिस्त म्हणजे शिस्त! जरा इकडचं तिकडं झालेलं चालत नाय त्यांना. दिलेला शब्द पाळला नाही की संपलं. तसा देवमाणूस हाय अगदी. पण जितका साधा तितका कडक!

हांडे : आलं लक्षात... एकूण कठीणच हाय आमचं.

महाले : आपण आपलं काम नीट केलं की घाबरण्याचं कारण नाय. हितं आल्यापासनं रिव्हाल्व्हर काढून त्या कपाटात ठेवलंय; त्याला हात पण लावला नाय अजून!

हांडे : (खिशातून सवयीने तंबाखूची डबी काढतो)

महाले : तंबाखू खातो का तू?

हांडे : (गोंधळून) हो, का?

महाले : (दम देत) खिशात ठेव ती डबी आधी! वास आलेलासुद्धा चालत नाय साहेबांना.

हांडे : म्हंजे तंबाकूसुद्धा खायचा नाही आम्ही? कमाल झाली!

महाले : इथं विसरायचं सगळं आता. तंबाखू, बिडीकाडी बाई-बाटली... पेंडसेसाहेबांना काही चालत नाही असलं.

हांडे : (निराश होत) मी सांगत होतो चव्हाणसायबांना की 'सायबर क्राइम'ला टाकू नका. हातापाया पडलो, पण आपलंच नशीब फुटकं, दुसरं काय? (डबी खिशात ठेवतो)

महाले : असं का बोलतोस? शिकशील तू!

हांडे : काय शिकणार? त्या 'सायबर क्राइम' मधलं एक अक्षर कळत नाय मला...

महाले : कॉम्पुटर तरी चालवता येतो का नाय?

हांडे : आयुष्यात सायकलशिवाय दुसरं कायबी चालवलं नाय साहेब.

महाले : येईल हळू हळू... मी शिकवीन तुला. (दाखवत) इकडं ये, हे बघ–

हांडे : तुमी ढीग शिकवाल पण मला इंट्रेस पायजे ना त्यात?

महाले : म्हणजे?

हांडे : माझी काय इथं राहण्याची विच्छा नाय. आमदारांना धरतो हाताशी आणि घेतो बदली करून... पगार बंद होऊ नये म्हणून हजर झालो इतकंच!

महाले : अरे पण गरज काय त्याची? चांगली संधी मिळालीय इथं नवीन काम शिकण्याची... नाव कमवून दाखवण्याची... साहेब खूष झाले तर प्रमोशन मिळेल...
हांडे : कसलं प्रमोशन मिळतंय? ‘काम जमत नाही’ असा रिपोर्ट देणार तुम्ही आणि मग सस्पेंड करणार उलट!
महाले : कोण कशाला सस्पेंड करतंय?
हांडे : हे तुमचं पोलिसस्टेशन सुरू झालं त्याला किती वर्ष झाली साहेब?
महाले : झाली असतील दोन वर्ष...
हांडे : दोन वर्षात हितनं किती हवालदार पळून गेले याची यादी देऊ का? आणि एवढ्या वर्षात एक तरी केस सुटली का इथनं? पेपरवाले रोज शिव्या देतात. वाचतो आमी.
महाले : वेळ लागतो इथं... गुंतागुंत खूप असते... येईल हळूहळू तुझ्या लक्षात.
हांडे : कामात चॅलेंज पायजे साहेब... लॅमिंग्टन रोडला असताना एकडाव आरोपीला घेऊन कोर्टात गेलो होतो... तर छोटा पप्पू असा समोरनं आला आणि डोक्यात गोळी झाडली...
महाले : कुणाच्या?
हांडे : माझ्या! (हसत) काय खुळ्यागत करताय असं? अहो पोलिसाचं लाइफ कसं पायजे?
महाले : कसं?
हांडे : रोज एक रेप, एकदोन मर्डर... एखादी घरफोडी!  हितं काय हाय त्यातलं?
महाले : येईल हळूहळू लक्षात तुझ्या...
हांडे : एखाद्याला शिक्षा करायची असेल, नायतर तो येडा झाला असंल तर उचलतात त्याला आणि टाकतात इकडं!
महाले : दुनिया किती झपाट्यानं बदलत चाललीय म्हायीत नाय तुला. नुसतं पाकिटमाराना आणि मटकेवाल्याना उचलत ऱ्हायलं तर अक्कल गंजून जाईल आपली. गुन्हेगाराला गुन्हा करायला घर सोडायची गरज राह्यली नाय आता!
हांडे : म्हणजे कसं म्हणता साहेब?
महाले : मागं तो वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हमला झाला....
हांडे : ते दोन टावर विमानानी पाडले ते?
महाले : बरोबर.
हांडे : मग?
महाले : ती विमानं कुठल्या दिशेला वळवायची हे ते दहशतवादी घरात बसून ठरवत होते.
हांडे : आकाशातली विमानं खालनं वळवत व्हते? तुमी सांगा आणि मी ऐकतो....
महाले : विश्वास बसणार नाय तुझा. पेंडसेसायबांना भेट म्ग कळंल तुला जगात काय चाललंय ते... अवकाशयानाचा मार्गसुद्धा आपण इथं बसून बदलू शकतो...
हांडे : (गोंधळून) अवकाशयान?
महाले : वर चंद्रावर, मंगळावर पाठवतात ते! 'ऑपॉर्चुनिटी हे नाव ऐकलसंल का कधी?
हांडे : नाय ब्बॉ...
महाले : बरं स्पिरीट?
हांडे : पिण्याचं स्पिरीट तेवढं माहीत हाय मला...

महाले : माणसानं मंगळावर पाठवलेल्या ‘स्पिरीट’ आणि ‘ऑपॉर्चुनिटी’ या यानांविषयी बोलतोय मी! त्यांचं नियंत्रण पृथ्वीवरनं करतोय माणूस, आहेस कुठं तू!

हांडे : आपल्या तर कायच डोक्यात येत नाय...

महाले : येईल हळूहळू... चल् वेळ फुकट घालवू नको, साहेबांनी नवीन अकाउंट उघडून ठेवायला सांगितलंय तुझं.

हांडे : अकाऊंट हाय माझं कुर्ल्याच्या बँकेत...

महाले : (हसत, कंम्प्युटरवर फॉर्म काढत) ते अकाऊंट नाही रे - आता सायबर क्राईमला आलास ना तू, इथं ई-मेल अकाऊट उघडायचंय तुझं... एकमेकांच्या संपर्कात राहतो आपण त्यामुळं... जगात कुठंही असलो तरी तिथनं काम करता येतं आपल्याला...

हांडे : ते कसं काय?

महाले : लॅपटॉप असला की झालं. नसला तर सायबर कॅफेत जायचं...

हांडे : (गोंधळलेला)

महाले : हॉटमेलवर उघडू की रिडिफमेलवर?

हांडे : असं काय करताय साहेब? अवो खरंच कायबी कळत नाय मला यातलं.

महाले : सायबांना कळलं तर घरी बसशील पहिल्याच झटक्यात! बोल, हॉटमेल? रिडिफमेल?

हांडे : (नाईलाजानं ) हॉटमेलवर काढा, ‘हॉट’ जरा बरं वाटतं ऐकायला ...

महाले : (हसत अकाऊंट ओपन करू लागतो.) संपूर्ण नाव काय तुझं?

हांडे : दयानंद मारूती हांडे.

महाले : (टाईप करत) शाब्बास! पासवर्ड कोणता ठेवणार आहेस तू? घे... कर इथं टाईप.

हांडे : पासवर्ड? तो कशासाठी?

महाले : त्या शिवाय अकाऊंट पाहू शकत नाही आपण. एखादा साधा-सोपा लक्षात राहील असा शब्द काढ!

हांडे : मला नाय काढायचा. तुम्हालाच टाका काय हवा तो.

महाले : अरे असं काय करतोस? तुझा पासवर्ड आहे तो! पासवर्ड म्हणजे कुलपाची चावी, ती आपली आपल्याकडं नको? कर टाईप इथं...

हांडे : तुमचा इतका आग्रह हाय तर तुमीच करा टाईप– (विचार करत) माझं नाव हांडे का नाय? तर टाका पासवर्ड कळशी!  हंडा-कळशी... (स्वतःचा हसतो)

महाले : (गंभीरपणे) कळशी! केएएलएएसएचआय... वा, छान! विसरू नको बरं का?

हांडे : आणि विसरलो तर!

महाले : तो पुन्हा शोधून काढण्यासाठी एक प्रश्न विचारलेला असतो आपल्याला. तो काढून बघायचा... त्याचं उत्तर दिलं की दिसतो पासवर्ड... आता बघ– तुझ्या आवडीच्या एखाद्या फुलाचं किंवा फळाचं नाव सांग बरं...

हांडे : गुलाब!

महाले : ओ. के. गुलाब... रो झ ... आपण रोझ टाकू -  आरओएसई... ओके! विसरू नको बरं का! (स्वतःशी) एण्टर! चल झालं तुझं अकाऊंट ओपन!  हे बघ... इकडे ये... हे वाच... वाच...

हांडे : (हळू हळू एकेक शब्द वाचतो) वेलकम टू हॉटमेल, मिष्टर दयानंद मारूती हांडे (हसतो) चॅयला कमाल झाली!

महाले : बस आता आणि सुरू कर काम! आधी जॉइनिंग रिपोर्ट सबमिट कर!

हांडे : साहेब तुमच्या पाया पडतो पण मला यात अडकवू नका! मला काय बी येत न्हाय यातलं... मुलासाठी घरात काम्पुटर आलाय म्हणून तेवढा शब्द तरी कानावरनं गेलाय पण खरं सांगायचं तर याबाबतीत एकदम अडाणी हाय मी साहेब...

महाले : (उपरोधानं) तीन पत्ता खेळता येतो का?

हांडे : (खुलत) त्यातला तर एकदम मास्टर माणूस आपण.

महाले : बसायचं मग?

हांडे : वा... चला, क्लब हाय का इथं एखादा बाजूला?

महाले : क्लब कशाला, हे बघ. (कॉम्प्युटरवर काढत) हा आला बघ तीन पत्त्याचा डाव. (कॉम्प्यूटरवर गेममध्ये जाऊन डाव काढू लागतो, संगणकाच्या पडद्यावर तो गेम दिसत आहे. हांडे अविश्वासाने पहात आहे. तो त्याला पत्ते कसे लावायचे हे समजावू लागतो. (हलकसं संगीत. कांही क्षणांनी प्रकाशाची उघडझाप. दारात ठाकूरबाई उभ्या)

ठाकूर : मी आत येऊ का?

महाले : हो, या या. कोण पायजे?

ठाकूर : पेंडसेसाहेब आहेत का?

महाले : अजून आले नाहीत पण येतील एवढ्यात...

ठाकूर : भेट घ्यायची होती त्यांची.

महाले : काही काम होतं का?

ठाकूर : अं... हो...

महाले : बोला.

ठाकूर : (थेट मुद्यावर न येता ) पेपरात नाव वाचलं त्यांचं...

महाले : कधी?

ठाकूर : त्यांनी इथं जेव्हा चार्ज घेतला तेव्हा पेपरात बातमी आली होती. त्याला दोन महिने झाले आता. परवा मुलाखतपण प्रसिद्ध झाली होती त्यांची 'लोकसत्ता'त... फोटोपण छापला होता...

महाले : (खवचटपणे) मग त्यांच्या फोटोची एखादी कॉपी पायजे का तुम्हाला? काय काम हाय ते बोला की लवकर!

ठाकूर : म... मला– तक्रार नोंदवायची होती...

महाले : (स्टेशन डायरी ओढून घेत, पेन काढून लिहून घेत) हं बसा, बोला. काय नाव तुमचं?

ठाकूर : वैशाली ठाकूर.

महाले : संपूर्ण नाव सांगा.

ठाकूर : वैशाली विजयकुमार ठाकूर.

महाले : वय?

ठाकूर : चाळीस.

महाले : राहणार?

ठाकूर : गायवाडी.

हांडे : (शब्दावर जोर देत) धंदा?

(महाले हांडेकडे रोखून बघतो. हांडे नरमतो.)

ठाकूर : (विचार करत) 'हाऊस वाईफ' असं लिहा तुम्ही.

महाले : ओके, सांगा? काय झालं नेमकं?

ठाकूर : तक्रार म्हणजे... तसं म्हणजे... मला.... मला... एक मुलगी आहे...

हांडे : (पुन्हा) मुलगी हाय ही काय तक्रार झाली व्हय? मुलगा झाला नाय त्याला आमी काय करावं? (हसतो)

महाले : ( हांडेला) तुला 'तीन-पत्ता' काढून दिलाय ना? तू खेळत बस बघू तिकडं...

हांडे : आईशप्पथ काय जमत नाय साहेब ते! नुसती बटणं दाबत बसण्यात काय गंमत हाय?

महाले : मग जरा गप बस थोडा वेळ. (बाईना) तर तुम्हाला एक मुलगी आहे, काय नाव तिचं?

ठाकूर : साधना.

महाले : (लिहून घेत) साधना, ओके... काय करते ती?

ठाकूर : इंजिनियरिंग कॉलेजला, डिग्रीला आहे, सेकंड इयरला ...

महाले : ते ठिकाय, पण तक्रार काय नेमकी तुमची?

ठाकूर : विचित्र पद्धतीनं वागायला लागलीय ती.

महाले : विचित्र वागायला लागलीय?

हांडे : (न राहवून पुन्हा) हे बघा बाई, मुलींना पदर आला की त्या असं विचित्र वागायला लागतात. काही काळजी करू नका, घरी जा आणि आराम करा!

ठाकूर : (नर्व्हस) म्हणून मी आधीच म्हणत होते की साहेबांशीच बोलायचंय म्हणून! ते येईपर्यंत थांबते मी वाटल्यास...

महाले : (हांडेला) हे बघ इथल्या कामाची तुला अजून काहीही माहिती नाय. कशाला मधीमधी तडमडतोयस?

हांडे : हो, सॉरी, सॉरी. (कान पकडत) सॉरी साहेब!

महाले : हं, बोला बाई ... विचित्र वागते म्हणजे नेमकी कशी?

ठाकूर : म्हणजे पूर्वीसारखा अभ्यास करत नाही, रागावलं तर वेळेवर घरी परत येत नाही... बोलत नाही.... कॉम्प्युटरवर बसली तर तासन्तास तशीच बसून राहते, जेवण्या-खाण्यात लक्ष नाही, का घरात काही काम करत नाही...

हांडे : (पुन्हा नाक खुपसत) तुम्ही चुकीच्या जागी आलात बाई. ही मेंटल हॉस्पीटलची केस हाय... जावा तिकडं, हवं तर पत्ता देतो, घ्या लिहून... (ठाकूरबाई डोळ्याला पदर लावून हुंदका देतात. महाले वैतागलेला. हलकं संगीत. पेंडसे येतात. दोघेही त्यांना सॅल्यूट मारतात. हांडे ओळख करून देतो.) हवालदार दयानंद हांडे रिपोर्टिंग सर....

पेंडसे : गूड... कधी जॉइन झालास तू?

हांडे : आत्ताच झालो सायेब.

पेंडसे : सर्व्हीस किती वर्ष झाली?

हांडे : सोळा सर.

पेंडसे : म्हणजे वयात आलास तू आता! (सगळे मोठ्यांना हसतात) गूड. काल बोललो मी चव्हाणसाहेबांशी... म्हणाले चांगला माणूस पाठवलाय... अशाच हुशार माणसाची गरज होती आम्हाला... काम नीट समजून घे इथलं ... जॉइनिंग रिपोर्ट दिलास?

हांडे : (चाचरत) स्स... स्सर...

पेंडसे : ई-मेल अकाऊंट ओपन केलंस नवीन?
हांडे : जुनं नव्हतंच!
पेंडसे : ( दमात घेत) जुनं नव्हतं? जास्त शहाणपणा करू नको. इथं मी सांगतो तेवढं ऐकायचं!
हांडे : (भांबावून) यस स्सर...
पेंडसे : नुसता पोलिसी खाक्या दाखवायचा नाही. असल्या काठ्याबिठ्यांची काही गरज नाही इथं. तिकडं कोपऱ्यात फेकून दे ती.
हांडे : पण, स्सर...
पेंडसे : (खिशातून फोन काढून ) महाले जरा चार्जिंगला लाव हा... सारखी बॅटरी का डाऊन होतेय याची कळत नाही ! ( तो “येस सर” म्हणत फोन चार्जिंगला लाऊ लागतो. बाईंना– ) आपण?
ठाकूर : (उठून उभी) मी वैशाली ठाकूर.
पेंडसे : ओके, काम होतं का काही? बोला...
ठाकूर : (डोळ्याला पदर लाऊन हुंदका देतात)
पेंडसे : हे बघा, इथं रडाय-बिडायचं काही काम नाही. आणि घाबरायचं तर अजिबातच नाही. यू आर इन सेफ हँड्स... हांडे ऽऽऽ
हांडे: यस सर?
पेंडसे : पाणी दे बाईंना... चहा सांगून ये... आणि मग गव्हर्नमेंटची वेबसाईट काढून काही नवीन जी. आर. निघालेत का चेक करून सांग मला!
(गोंधळातच “सर, येस सर” म्हणत पाण्याचा ग्लास आणून ठाकूरबाईंना देतो आणि चहा सांगण्यासाठी बाहेर जातो.)
पेंडसे : (बाईंना) हं बोला... काय प्रॉब्लेम आहे?
ठाकूर : माझी मुलगी साधना, इंजिनियरिंग कॉलेजला, सेकंड इयरला आहे... गेल्या पाच सहा महिन्यांपासून अचानक चमत्कारिकपणे वागायला लागलीय... घरात आली की सारखी कॉम्प्युटरवर बसून राहते...
पेंडसे : (पुढची स्टोरी स्वत:च सांगतात) खात नाही, पीत नाही, काही विचारलं तर नीट बोलत नाही... दहावीला ९० आणि बारावीला ८५ टक्के मार्क्स मिळाले, मेडिकलला ॲडमिशन मिळाली नाही म्हणून इंजिनियरिंगला टाकली. पहिल्या वर्षी सगळं नीट चाललं होतं, पण आता अभ्यास करीना, प्रॅक्टिकलला जात नाही, ट्युटोरियल्स देत नाही...
ठाकूर : (आश्चर्यानं) तुम्हाला कसं माहीत साहेब?
पेंडसे : मालक सरकारी नोकरीत बड्या हुद्यावर असतील तुमचे? नाहीतर बिझनेस असेल एखादा....
ठाकूर : 'क्लियरिंग एजन्सी आहे साहेब आमची. बी.पी.टी.मध्ये.
पेंडसे : बरोबर, काम फार असतं तिथं... रात्री-बेरात्री जहाजातून माल येतो, मोठमोठ्या उलाढाली कराव्या लागतात, जोखमीचं काम आहे त्यामुळं घरात लक्ष देता येत नाही मिस्टरांना...
ठाकूर : बरोबर साहेब.
पेंडसे : तुम्ही हटकलं तर म्हणतात, 'घरात काही कमी पडू देतोय का मी तुला? पैसे हवे असतील तर सांग पण पोरीचं काय ते तूच बघ'
ठाकूर : अगदी बरोबर साहेब, पण तुम्हाला कसं...

पेंडसे : मला माहीत नसतं तर पोलिसात भरती झालो असतो का मी? (हसतात) हे बघा ठाकूरबाई, काही काळजी करू नका तुम्ही, एवरीथिंग वुईल बी ऑलराईट...

ठाकूर : मला वाटतं साहेब.....

पेंडसे : बोला, स्पष्टपणे बोला अगदी, एकदा सांगितलं ना इथं कुणालाही घाबरण्याची गरज नाही म्हणून!

ठाकूर : मला असं वाटतं की तुम्ही लाईटली घेताय हे प्रकरण.

पेंडसे : (विचारपूर्वक) फार गंभीरपणे घेण्यासारखं काय आहे त्यात?

ठाकूर : घरात एक नवीनच भानगड सुरू झालीय आता.

पेंडसे : कोणती भानगड?

ठाकूर : आज सकाळपास्नं फोन उचलला की त्यावर एकच वाक्य ऐकू येतंय. फोनवर एकच वाक्य ऐकू येतंय?

पेंडसे : कोणतं वाक्य? बोला की !

ठाकूर : 'माझी होशील का?'

पेंडसे : काय?

ठाकूर : "माझी होशील का?" टेप लावून ठेवलेय कुणीतरी असं वाटतं.

पेंडसे : (उठून स्वत:शीच विचार करत माझी होशील का? फोनवर ... टेप...' असं पुटपुटत एकीकडे येतात. फोन वाजतो. महाले धावत जाऊन फोन उचलतो.)

महाले : (फोन उचलत) नमस्कार, 'सायबर क्राइम पोलिस स्टेशन मधनं पी.एस.आय. विक्रम महाले बोलतोय... हो हो... बरोबर... कोण बोलताय आपण? (माऊथपीसवर हात ठेऊन) गांगुलीसायेब!

पेंडसे : (पळत) चॅयला, सकाळी सकाळी कमीशनर साहेबांचा फोन? तिसरं महायुद्ध सुरू झालं की काय? (फोन घेत) नमस्कार सर, पेंडसे बोलतोय सर... सर... सॉरी सर बॅटरी डाऊन झालीय म्हणून आत्ताच चार्जिंगला लावलाय. सर... सर ... सर...! (थोडा रिलॅक्स होत) थँक्यू सर... शर्माला पकडला त्यात फार काही विशेष नव्हतं सर. पत्रकारांनी बरीच प्रसिद्धी दिली त्या प्रकरणाला. सर... येस सर... इथं येऊन दोन महिने झाले सर.(नीट ऐकत) हो सर, येस सर... कविता शर्मा आणि शुभांगी बर्वे दोन्ही प्रकरणांची माहिती घेतलीय मी साहेब. दोन्ही प्रकरणं तशीच ठेवून दिली होती मोकलनं. मोकल कसा माणूस आहे, यू नो सर. सर... सर... सर... मी अभ्यास करतोय साहेब. ब्लॅकमेलिंगची प्रकरणं आहेत असं वाटतंय... समबडी वॉज ट्राईंग टू ब्लॅकमेल देम. काही अश्लील फोटो आणि अश्लील टेप्समध्ये गुंतवलं होतं त्यांना. मी पाहतो सर... नक्की सर... ऑफकोर्स सर... मध्यमवर्गीय माणसांच्या घरातल्या तरूण मुली अशा धडाधड आत्महत्या करायला लागल्या आणि गुन्हेगार सापडत नसला तर मुंबई पोलिसांच्या क्रेडीबिलिटीचा प्रश्न निर्माण होईल, हे मलासुध्दा कळतंय सर... यस सर... आय नो सर... ओके सर... काय सर? (तत... पप करत) पण सर माझा फोन... बॅटरी ... जुनं मॉडेल आहे साहेब ... डिपार्टमेंट पैसे पण देत नाही फोनचे सर! तक्रार नाही पण यू नो सर... ओके सर... सर... ( फोन ठेवतात. संगीत बाहेरून हांडे चहा घेऊन येतो आणि सर्वांना देतो.)

ठाकूर : (चाचरत) ते साहेब, आत्महत्त्या... मुली...

पेंडसे : तुम्ही चहा घ्या... काळजी करू नका, घ्या घ्या!

ठाकूर : (पेंडसेंना) तुमची मुलाखत वाचलीय मी. तुमच्या बिनधास्त स्वभावाबद्दल बरंच लिहिलय...

पेंडसे : थँक्यू... बट यू सी, अशा स्तुतीला भाळणारा माणूस नाही मी. आय हॅव डन माय ड्यूटी ...

ठाकूर : अगदी वेगळ्याच प्रकारचा गुन्हा होता तो.
पेंडसे : यालाच 'व्हाईट कॉलर्ड' गुन्हेगारी म्हणतात. भविष्यातले सगळे गुन्हे आता असेच असणार आहेत, मिसेस ठाकूर ...
ठाकूर : तुम्ही त्याला पकडला नसता तर सगळी बँक लुटली असती त्यानं...
महाले : खरंच सायेब, तुमचं डोकं म्हणजे कॉम्पुटर हाय.
पेंडसे : ए बाबा, आता जास्त शहाणपणा करू नको. तुम्ही सगळ्यांनी मदत केलीत म्हणून जमलं ते. परदेशी ऑल्सो प्लेड व्हेरी इम्पॉर्टंट रोल इन दॅट केस... काकडेने, रसाळनेही चांगली कामगिरी केली... क्रेडिट गोज टू ऑल ऑफ यू. (चहा संपवून ग्लास टेबलावर ठेवत महालेला) हे बघ, मी हांडेला घेऊन बाईंच्या घरी जाऊन येतो.
महाले : यस सर.
पेंडसे : तू वझेला फोन करून बोलावून घे इथं.
महाले : त्यांना बोलवण्याची गरज-
पेंडसे : मी सांगतो तेवढं ऐकायचं... त्याला म्हणावं हातातलं काम सोडून बोलवलंय, समजलं?
महाले : पण साहेब...
पेंडसे : काय?
महाले : ही केस सिक्स्टीसेव्हनची आहे असं मला वाटतं... पब्लिकेशन ऑफ ऑब्सीन मटेरियल इन ई- फॉर्मेट! मग वझेंना कशाला...
पेंडसे : मला अक्कल नाही का तेवढं कळायला?
महाले : (गप्प)
पेंडसे : अरे, फोनवर टेप लावून ठेवलीय म्हणजे फार पोचलेला माणूस असणार तो! आणि कुणाची मदत कधी होईल सांगता येईल का? (ठाकूरबाईंना) चला... बाय द वे, शिक्षण किती झालं तुमचं?
ठाकूर : बी. एस्सी आहे मी सर...
पेंडसे : व्हेरी गूड, मला वाटलंच होतं तुम्ही ग्रॅज्यूएट असणार म्हणून. ( खिशातून पॉकिट काढून त्यातलं एक कार्ड काढून बाईंच्या हातात देत) हे घ्या ...
ठाकूर : हे काय साहेब?
पेंडसे : वाचा की!
ठाकूर : (वाचत) 'वझे ॲण्ड गोडबोले इन्फॉर्मेटिक्स' (गोंधळून) लक्षात आलं नाही साहेब?
पेंडसे : तिथं जाऊन कॉम्प्यूटर बेसिक कोर्ससाठी ॲडमिशन घ्यायची. माझं नाव सांगायचं. वझे मित्र आहे माझा. रोज दुपारी दोन-तीन तास बसायचं त्याच्याबरोबर... पंधरा दिवसात शिकाल तुम्ही.
ठाकूर : पण मी साहेब... मला... म्हणजे आय मीन, मी कॉम्प्युटर कशाला शिकायचा साहेब?
पेंडसे : मुलगी जगायला पाहिजे ना?
ठाकूर : माझ्या कॉम्प्युटर शिकण्याचा आणि मुलगी जगण्याचा काय संबंध साहेब? काय बोलताय तुम्ही?
पेंडसे : कॉम्प्युटर स्वतःच्या मर्जीने आणला ना तुम्ही घरात? इंटरनेट आहे ना?
ठाकूर : हो... म्हणजे, मिस्टरांना बरंच काम असतं त्यावर. आर्डर्स असतात... जगभर संपर्क साधावा लागतो. त्यांच्या सोयीसाठी घेतला, साधनाला दुसरा स्वतंत्र कॉम्प्युटर घेऊन दिलाय आम्ही...

पेंडसे : कॉम्प्यूटर घरी आला तेव्हा शेजाऱ्यापाजाऱ्यांना बोलावून कौतुक केलंत ना?
ठाकूर : हो!
पेंडसे : मग आता लक्षात घ्या; घरात आपखुशीनं आणलेलं काम्प्यूटरचं भूत तुमच्या मानेवर बसायला निघालय, त्याला हाकलायचंय आहे आपल्याला!
ठाकूर : काही समजत नाही साहेब.
पेंडसे : आणि ते एवढ्यात समजणारसुद्धा नाही. मी सांगतो तेवढं ऐका फक्त... चला... आणि हे बघा...
ठाकूर : काय साहेब?
पेंडसे : तुम्ही कॉम्प्युटर शिकताय हे तुमच्या नवऱ्याला आणि मुलीला - काय नाव तिचं?
ठाकूर : साधना.
पेंडसे : हां, तर तिलाही कळता कामा नये. ओके?
ठाकूर : हो साहेब... तसं मला थोडं कंप्युटरमधलं... मी कॉलेजात असताना...
पेंडसे : अहो ते बाबा आदमच्या जमान्यातलं सांगताय तुम्ही! आता इथं क्षणाक्षणाला नवी टेक्नॉलॉजी येतेय... (दमात घेत) तुम्हाला माझा वेळ बरबाद करायचाय का?
ठाकूर : सॉरी साहेब, समजलं.
पेंडसे : (निघत) चल हांडे...
हांडे : पण सर, मला सर...
पेंडसे : अरे, काय सर सर करतोयस?
हांडे : मला सर, काम्पुटरमधलं कायबी कळत न्हाय सर...
पेंडसे : (धक्का) काय?
हांडे : हो सायेब.
पेंडसे : शुद्धीवर आहेस का तू?
हांडे : आई शप्पत सायेब, मी एकदम अडाणी माणूस हाय त्या बाबत, नाहीतर मग जॉइनिंग रिपोर्ट दिला नसता? गव्हर्नमेंटची साईट काढून दावली नसती मगाधरनं?
पेंडसे : चव्हाणसाहेब तर म्हणाले की चांगला नॉलेजेबल माणूस दिलाय म्हणून?
हांडे : (मान खाली घालतो)
पेंडसे : नोकरी करायचीय ना तुला?
हांडे : हजाराचा मॉब कंट्रोल करायला सांगा, धा जणांची डोकी फोडायला सांगा, पाचव्या माळ्यावरनं उडी मारायला सांगा नायतर एखाद्याचा एन्काऊंटर करायला सांगा... पण यातलं काही जमत नाही आपल्याला सायेब.
पेंडसे : च्यॅयला... म्हणजे मी पोलिस स्टेशनबरोबर शाळा पण चालवावी तुमच्यासाठी असं वाटतं का काय डिपार्टमेंटला? (कॉम्प्युटरकडे जात) इकडे ये, ये असा, घाबरू नको बैस... बैस इथे... (त्याला समजावून सांगत, मॉनिटरवर हात ठेवत) हे कॉम्प्युटरचं थोबाड, हा की बोर्ड, हा माऊस (सीपीयूवर थाप मारत) आणि हा कॉम्प्यूटरचा भेजा. इथं हार्ड डिस्क असते. आपण जसा डोक्यानं विचार करून निर्णय घेतो तसाच विचार करण्याचं काम इथं होतं, पण एक लक्षात ठेवायचं, याला स्वत:चा मेंदू नाही. माणसाच्या मेंदूनं चालतो तो... काय?
हांडे: काही समजत नाही सायेब.

पेंडसे : (दमात घेत) ही कस्टडी दिसते बाजूची? महालेला विचार काय ते. काय महाले? (महाले आणि ते हसतात) आपला दुसरा हवालदार रसाळ, तो तुझ्यासारखंच करत होता आला तेव्हा... मग तो आणि हा कॉम्प्युटर आठ दिवस कस्टडीत एकत्रच होते. नवव्या दिवशी ट्रेंड होऊन बाहेर पडला, तुला हवं असं ट्रेनिंग?

हांडे : (बदलत) नको सायेब, मी प्रयत्न करतो शिकायचा...

पेंडसे : (मोठ्याने हसत) व्हेरी गूड. (त्याला जवळ घेऊन त्याच्या पाठीवर हात ठेवत) हे बघ, तुला एक गम्मत दाखवतो. (महालेला सूचना देतात. महाले फॉलो करतो. संगीत) महाले, जरा गेम मध्ये जा. चोर-पोलिस गेम काढ. ओके... ओके... त्याला चोर-पोलीस हा गेम काढून दाखवतात, त्यात तो हळूहळू रंगून जातो. हळूहळू अंधार होत आहे. ) हे बघ, हा माणूस दिसतोय तुला? (संगणकाच्या पडद्यावर त्याला तो गेम दिसत आहे.)

हांडे : हां... व्हय की, लयी जंटलमन दिसतोय.

पेंडसे : आता हा बँकेच्या दारात उभा आहे... बरोबर !

हांडे : बरोबर...

पेंडसे : शाब्बास, आता तो बँकेतनं बाहेर पडला... दिसतोय?

हांडे : (गुंतत) हो सायेब, त्याच्या हातात बॅग हाय म्हणजे बॅगेत पैसे असणार सायेब...

पेंडसे : व्हेरी गूड. आता पुढं काय होतंय काळजीपूर्वक बघ.

हांडे : ( एकदम रंगून जात) आ तिच्यायला, हा जंटलमनसारखा माणूस लागला की त्याच्या मागं... आणि आत्ता?... झडप मारून बॅग वढली की त्याची, आन चाल्ला की पळून... हाना तिच्या आयला, मारा जोड्यानं... अरं थांब की रे... ए सुकाळीच्या!

पेंडसे : (हसत) हे बघ, असा आरडाओरडा करून काहीही होत नाही इथं... डोक्याचं काम असतं इकडं सगळं. (स्वतः करून दाखवत) हे बघ, हे शिफ्टचं बटण असं दाबायचं आणि त्या चोराकडे जाणारा हा बाण असा दाबत राहायचं. बघ, बघ... हा हवालदार त्याच्या मागं लागला की नाही?

हांडे : (आश्चर्याने) व्हय सायेब.

पेंडसे : आणि आता हे बटन दाबून ही अशी उडी मारून पकडायचं त्याला... पकडला?

हांडे : हो सायेब...

पेंडसे : आहे की नाही गम्मत?

हांडे : पण सायेब...

पेंडसे : काय?

हांडे : त्यानं जर शस्त्र काढून आपल्यावर हल्ला केला तर?

पेंडसे : तर मग आपणही शस्त्र काढायचं.

हांडे : ते कसं काय?

पेंडसे : हे बघ ... ह्या कीज् बघ... इथं आपला शस्त्रसाठा असतो. (बटण दाबत) दिसला? एफ् वन् दाबलं की तलवार, एफ् टू दाबलं की रिव्हाल्व्हर, एफ थ्री दाबलं की मशीनगन आणि एफ फोर दाबलं की बॉम्ब ... काय पाहिजे यातलं तुला?

हांडे : (आवेशात) रिवाल्वर घेतो सायेब.

पेंडसे : व्हेरी गूड. (करून दाखवत) एफ् वन... हे बघ, आता हा असा नेम धरायचा... धरलास?

हांडे : हो धरला सायेब.
पेंडसे : आता हे बटण दाबलं की 'फायर' होइल, आलं लक्षात?
हांडे : आलं ध्यानात सायेब.
पेंडसे : मग कर आता 'फायर'. ( ते फायर असं ओरडतात. त्या क्षणी हांडे ते बटण दाबून 'फायर' करतो. मोठा आवाज. वातावरण दणाणून जातं. मग पोलिस व्हॅनचा आवाज ॲम्ब्युलन्सचा सायरन, माणसांच्या किंकाळ्या. प्रकाशाची उघडझाप. पेंडसे खुशीने हसत आहेत तर तर हांडे आश्चर्यचकित झालेला...ठाकूर बाई आश्चर्यचकित होऊन पहात आहेत हळूहळू अंधार. )

अंक पहिला : प्रवेश दुसरा

(स्थळ : पुन्हा पोलिस स्टेशन. महाले कॉम्प्युटरवर ई -मेल पहात आहे. त्यात तो इतका एकाग्र होऊन गेला आहे की फोन वाजत आहे तिकडे त्याचे लक्ष नाही. बाहेरून हांडे घाईघाईने येतो. त्याच्या हातात पुष्पगुच्छ. तो एका हातात ठेवून दुसऱ्या हाताने पट्कन फोन उचलतो.)
हांडे : नमस्कार, 'सायबर क्राईम पोलिस स्टेशन' मधनं हवालदार हांडे बोलतोय.... हो... बरोबर... बरोबर... हां... हां... कोण बोलतंय? गवर्नमेंट डेरीतनं? बरं ... काय काम होतं? बरं... बरं... काय? पण पेंडसेसायेब आलेले नाहीत अजून... हां... हां... थोडा वेळ वाट बघा तुम्ही. साहेब येतीलच आता. काहीतरी व्यवस्था करतील ते. बरं... नमस्कार. (फोन ठेवत महालेला) एवढा वेळ फोन वाजतोय.... लक्ष कुठं आहे तुमचं?
महाले : आपलं ई -मेल अकाऊंट बघत होतो, एक भलताच मेसेज येऊन पडलाय.
हांडे : भलताच मेसेज?
महाले : ई शायरी पाठवलीय कुणीतरी.
हांडे : शायरी? आपल्याकडं कोण कशाला मरायला शायरी पाठवील?
महाले : आपला ॲड्रेस मिळवून त्यावर असे संदेश पाठवणारे खूपजण असतात बाहेर. कधी कधी मुद्दाम शेकडो मेल एकदय पाठवून आपलं काम बंद पाडतात ते...
हांडे : असंच कायतरी म्हणत होता तो माणूस आता फोनवर... गव्हर्नमेंट डेरीमध्ये अशीच कायतरी गडबड...
महाले : (त्याला रोखत) अरे मग मला द्यायचा नाही फोन?
हांडे : लक्षातच आलं नाही माझ्या...
महाले : (काळजीत) कंप्लेंट तरी नोंदवायला सांगायची. साहेबाना कळलं तर मेमो देतील आपल्याला. (हांडे ओशाळतो) परत आला तर दे आता.
हांडे : हो साहेब.
महाले : ऐक! (आवेशात)
जबसे मेरी जिंदगीमे आयी है एक फिमेल
भूल गया हूं सब कुछ, क्या मेल बॉक्स, क्या ई - मेल?
(दोघेही हसतात) आणि हा एक शेर ऐक!
घरसे जब वो निकली पहनके रेशमी गाऊन

जाने कितने दिलों का हो गया सर्वर डाऊन

हांडे : (गोंधळून) ‘रेशमी गाऊन’ पर्यंत समजलं पण 'सर्वर डाऊन' म्हणजे काय ते कळलं नाही.

महाले : (समजावत) सर्वर डाऊन होणं म्हणजे काम बंद पडणं... दिल का सर्वर डाऊन होणं म्हणजे हार्टफेल, समजलं? (हसतो.)

हांडे : (हसत) समजलं, पण उठा आता, कमिशनरसायेब येतायत... नाहीतर खरंच हार्टफेल होईल आपला...

महाले : हो खरंच की, सायेब कसे आले नाहीत अजून?

हांडे : निघालेत ते घरनं. मला फोन करून एक पुष्पगुच्छ आणून ठेवा म्हणून सांगितलं... (पुढे करत) हा घे...

महाले : मी इतकी वर्ष सर्वीस केली पण कमिश्नरसायेबांना जवळनं बघण्याचा असा चान्स मिळाला नव्हता कधी.

हांडे : कशाला येत असतील ते? तुमचा अंदाज काय?

महाले : (फिरकी ताणत) मला वाटतं, तुझ्या प्रमोशनची ऑर्डर घेऊन येत असतील.

हांडे : कशाला गरिबाची चेष्टा करताय महालेसाहेब? तुम्हाला खरं सांगू का?

महाले : काय?

हांडे : खरं प्रमोशन मिळायला पायजे ते पेंडसेसायेबाना!

महाले : हां, हे मात्र बरोबर बोललास. आतापर्यंत असिस्टंट कमिशनर झाले असते पण चमचेगिरी करायची सवय नाय ना त्यांना त्या मोकलसारखी. लायकी नसताना सिनिअर पी.आय. झाला तो...

हांडे : गेल्या आठवड्यात आमी त्या ठाकूरबाईच्या घरी गेलो होतो तर पाच मिन्टात प्रॉब्लेम सोडवला साहेबांनी.

महाले : अरे हो, काय झालं होतं रे नेमकं?

हांडे : फोन उचलला की आवाज यायचा ना 'माझी होशील का - माझी होशील का' ?

महाले : अरे, हो पण - पुढं काय झालं त्याचं?

हांडे : आपले सायेब, वझेसायेबांशी फोनवरनं कायतरी बोलले. मग एक्सेंजमध्ये बोलले, आणि धा मिन्टात बंद झाला तो आवाज. त्या नंतर निघालो आम्ही तिथनं...

महाले : कुणी केला होता तो उद्योग?

हांडे : अजून सापडला नाय आरोपी, परदेशीसाहेब आणि काकडे आहेत कामगिरीवर! शिवाय वझेसाहेब आहेतच!

महाले : मग झालं तर. तो वझे म्हणजे अगदी सुपरकॉम्पूटर हाय बघ. किडा आहे आय. टी. मधला. कायबी अडचण असली तर लगेच मदतीला उभा राहतो सायेबांच्या.

हांडे : भेटलं पाहिज त्याला एकदा...

महाले : भेट... भेट... जरूर भेट. आठ दिवसात तयार करील तो तुला... मी पण घेतलंय ट्रेनिंग त्यांच्याकडं (पेंडसे ताडताड येतात, दोघेही त्यांना कडक सॅल्यूट मारतात.)

पेंडसे : कसल्या गप्पआ चालल्यात? कामं नाहीत का?

हांडे : (तत पप करीत) नाय सायेब, कमिशनरसायेब येणार म्हणून...

पेंडसे : म्हणून काय काम करायचं नाय का काय, चला कामाला लागा...

महाले : कशासाठी येतायेत सायेब? काही कळलं का?

पेंडसे : मलासुद्धा काही कल्पना नाही, काहीतरी महत्त्वाचं काम आहे एवढंच म्हणाले !

महाले : मला वाटतं सायेब...

पेंडसे : काय?
महाले : तुमच्या प्रमोशनची आर्डर घेऊन येत असतील ते.
पेंडसे : (मोठ्याने हसत) अरे वेडा झालास का तू? साहेबलोक कधी आपल्या हाताखालच्या माणसांच्या भल्याचा विचार करतात का? ऑर्डर आणलीच तर सस्पेंशनची नाहीतर बदलीची असेल. (हसतात) आणि आपण काय केलंय असं प्रमोशन मिळविण्यासारखं?
महाले : त्या बँक मॅनेजरला पकडून दिलं नाही का हातोहात? दोन वर्षापासनं हाय मी हितं पण ही पहिलीच केस बघतोय आपण सोडवलेली.
पेंडसे : जाऊ दे रे बाबा, भगवद्गीतेत काय म्हटलंय माहीत आहे ना, फळाची अपेक्षा न धरता माणसानं आपलं काम करत राहावं... (फायली चाळत हांडेला) पुष्पगुच्छ?
हांडे : आणलाय सर.
पेंडसे : काही मेसेज, फोन?
हांडे : अरे हो सायेब, थोड्या वेळापूर्वी फोन होता.
पेंडसे : कुणाचा?
हांडे : 'माहिमच्या गव्हर्नमेंट डेरी मधनं ...
पेंडसे : कशासाठी?
हांडे : त्यांची ई-मेल सेवा बंद पडलीय... मोठा गोंधळ झालाय असं म्हणत होते.
पेंडसे : (खिशात हात घालत) बरी आठवण केलीस...
हांडे : कुणी तरी त्यांना ई-मेल पाठवून त्रास देतंय असं म्हणत होते...
पेंडसे : आलं लक्षात (खिशातला मोबाईल काढून बटणं दाबू लागतात) मग काय सांगितलंस तू त्यांना?
हांडे : त्यांना म्हणालो आता. सायेब आल्यावर पुढची कारवाई करतील...
पेंडसे : माझी कशाला वाट बघायची? नेमकी तक्रार काय आहे ती नोंदवून घ्यायची अशा वेळी... तुझाही ई-मेल आकाऊंट आहे आता. (महालेला) आणि तू काय गोट्यांनी खेळत होतास का?
महाले : (निरूत्तर)
पेंडसे : (मोबाईलवर) हां परदेशी, माहीम डेरीच्या ऑफिसात जायचं. सर्व्हरवर अॅटॅक केलाय कुणीतरी त्यांच्या... गोंधळ झालाय नुसता... किती दूध घ्यायचंय, किती वाटायचं, भाव काय लावायचा - काहीच लक्षात येत नाही कुणाच्या... (ऐकत) 'डिनायल ऑफ सर्व्हस अॅटॅक... येस... राईट... (फोनवर हात ठेवून हांडेला) एखाद्याच्या मेलवर एकदम लाखो संदेश पाठवायचे आणि त्याला काम करणं अशक्य करुन टाकायचं... ट्रॅफिक जॅम झाल्यावर वाहतूक व्यवस्था कोलमडून पडते ना, तसाच प्रकार आहे हा... (पुन्हा फोनवर ) तशी सोपी केस आहे अगदी, तुम्ही तुमच्या लेव्हलला सोडवू शकाल... काही अडचण असली तर सांगा मला... (नाराज) अरे काय परदेशी, बाजूच्या कुठल्याही सायबर कॅफेत जाऊन बसायचं, ई-मेल अॅड्रेस बदलायचा, क्लाएंट लिस्ट घ्यायची, सगळ्यांना नवा अॅड्रेस द्यायचा, काय झालंय ते कळवायचं आणि सहकार्य करायला सांगायचं... वेळ जाईल यात थोडा पण... (एकदम भडकत) अरे एक सर्व्हर गेला तर दुसरा! याहूचा बाप हॉटमेल, दोन्ही गेले तर जी-मेल.... (पुन्हा एकदम शांत) वरळी नाक्यावर ट्रॅफिक जॅम झाली तर आपण वरळी सी फेसकडनं काढतो की नाही गाड्या? अगदी तसंच... समजलं? ओके? गूड... गूड... बाकी काय चाललंय? रसाळ काय करतोय? हां... हां... येस... येस... गूड... गूड... एक मिनिट

सोडायचं नाही म्हणावं त्या ठाकूरला ... ओके व्हेरी गूड. आणि काकडेचं मिशन कुठवर आलं? 'माझी होशील का' च्या बापाला शोधल्याशिवाय घरी परतणार नाही म्हणतो? (हसतात) ओके व्हेरी गूड. बरं, बरं... बरं... आँ? हां, कमिशनरसाहेब कशासाठी येताहेत काही कळलेलं नाही. (हसत) अरे कसलं प्रमोशन! तुमचं सगळ्यांचं प्रेम मला जास्त महत्वाचं वाटतं. आय ॲम सो प्राऊड ऑफ ऑल ऑफ यू... तुम्ही जर अशीच साथ दिलीत तर एक दिवस आपल्या ह्या सायबर क्राइम सेलचं नाव जगात गाजवू आपण. (बाहेर सायरन वाजतो) चल्... आले वाटतं साहेब, ओके... बाऽऽऽय... (मोबाईल बंद करून खिशात ठेवतात आणि दरवाजाकडे धावतात. दरवाजात गांगुली उभे. तिघेही त्यांना सॅल्यूट मारतात.)

पेंडसे : (पुष्पगुच्छ देत) वेलकम सर!

गांगुली : आय डोन्ट लाईक फॉरमॅलिटिज लाईक धिस, यू नो मिष्टर पेंडसे...

पेंडसे : येस सर पण तुम्ही पहिल्यांदाच आलात इथं. एवढा मोठा अधिकारी एका छोट्या पोलिसस्टेशनमध्ये यावा याचं अप्रूप वाटतंय आम्हाला.

गांगुली : ओके.. ओके.. (पुष्पगुच्छ पुन्हा पेंडसेंच्या हातात देत) घ्या! या पुष्पगुच्छाचे खरे मानकरी तुम्हीच आहात.

पेंडसे : (गोंधळून) ते कसं काय सर?

गांगुली : त्या शर्माला ज्युडिशियल कस्टडीत पाठवलंत का नाही तुम्ही? (देत) घ्या - घ्या. (तो घेतो)

पेंडसे : थँक्यू सर, पण आमच्या संपूर्ण स्टाफनं कष्ट केलेत त्यासाठी. परदेशी, काकडे, रसाळ... रात्रंदिवस मेहनत केली साहेब या लोकांनी.

गांगुली : बट द कॅप्टन इज मोअर इंपॉर्टन्ट! इजन्ट इट? महाभयंकर माणूस आहे तो शर्मा म्हणजे गोरगरीबांच्या व्याजातनं लाखो रुपये उकळत होता. हिशेबाचं जे समीकरण होतं तेच त्यानं बदलून ठेवलं, म्हणजे तुम्हाला जर एक हजार रुपये व्याज मिळणार असेल तर प्रत्यक्षात नउशे नव्याण्णव रूपयेच मिळत होते. फरकाची ही रक्कम अगदी किरकोळ असल्यामुळे कुणाच्या लक्षातही येत नव्हतं. सलामी स्लाईसिंग म्हणतात याला...

पेंडसे : येस सर, आय नो.

गांगुली : (हसत) वर्स्ट पार्ट ऑफ द केस इज, इव्हन द आय. टी. सेक्शन ऑफ द बँक कुड नॉट नोटीस दॅट... मोठमोठ्या बाता मारतात पण अक्कल काही नाही या लोकांना... नुसते कोट टाय घालून, हातात लॅपटॉपच्या बॅगा घेऊन फिरलं म्हणजे अक्कल आली असं नाही...

पेंडसे : बरोबर सर, आणि एकीकडं हे सायबर क्रिमिनल्स इतक्या झपाट्यानं नवे मार्ग शोधून काढतायत की सरकार सोडाच पण कार्पोरेट सेक्टरही पुरं पडू शकत नाही त्यांना तोंड द्यायला.

गांगुली : टेल मी वन थिंग. एक्झॅक्टली काय केलं तुम्ही शर्माला पकडण्यासाठी?

पेंडसे : : बँकेतल्या संगणकापासून व्ही. एस. एन.एल.च्या. सर्व्हरपर्यंत सर्वत्र त्यानं प्रोग्रॅम चेंज करून ठेवला होता.

गांगुली : (कौतुकाने) आय सी...

पेंडसे : सर्वरचा पासवर्ड मिळवून सोर्सकोड अल्टर केलाय त्यानं. हे लक्षात येताच हार्डडिस्कवर सगळ्या फाईल्स कॉपी करून घेतल्या आम्ही त्याच्यासमोरच. चळचळा कापत होता. आय. टी. ॲक्टचं सेव्हन्टी टू कलम लावलं! ब्रेकिंग कॉन्फिडेन्शिऍलिटी ऑफ द इन्फर्मेशन ... एवढ्यात सुटत नाही तो आत्ता! अशी केस प्रेझेंट केलीय की जामीनपण मिळू देत नाही त्याला मी, बघा तुम्ही साहेब!

गांगुली : (विराम. संगीत) फ्रँकली स्पिकिंग, आजपर्यंत एक बदनाम पोलिस स्टेशन म्हणून या 'पोलिस स्टेशन' कडं लोक बघत होते पण तुम्ही त्याची एक नवीनच ओळख लोकांना करून दिलीत. आय मस्ट ॲप्रिशिएट दॅट...

पेंडसे : थँक्यू सर... पण आपल्या लिमिटेशन्स खूप आहेत सर. गाड्या नाहीत धड की संगणक! आरोपी गुन्हा करून घरी पोहोचला तरी जागेवरनं गाडी हलत नाही आपली.

गांगुली : येस, आय नो. आज ना उद्या आपल्याला नव्या गाड्या मिळवाव्या लागतील. आपला स्वतःचा इंजिनियरिंग सेल निर्माण करावा लागेल. सायबर पोलिस आणि ई-कोर्टस्सुद्धा लवकरच सुरू करावी लागतील. काळाप्रमाणे बदललं नाही तर मोडून पडू आपण.

पेंडसे : अगदी देवासारखं बोललात साहेब... माझं एक स्वप्न आहे साहेब, आपल्याकडं चांगले कॉलिफाईड सायबर पोलिस हवेत, स्टेट ऑफ द आर्ट अशी सायबर सिस्टिम हवी, डेडिकेटेड सर्वर हवा. बसल्या जागी अशा प्रकरणांचा निकाल लावता आला पाहिजे आपल्याला.

गांगुली :  बघूया हळूहळू, प्रयत्न करू. तुम्ही एक डिटेल प्रपोजल द्या. मी बोलतो होममिनिस्टरशी इफ रिक्वायर्स सीएमशी बोलू आपण...

पेंडसे : सॉरी टू से सर, पण हे मंत्री आपल्या खुर्च्या टिकवण्याच्या उद्योगात इतके मष्गुल असतात की त्यांना आपले प्रश्न सोडवायला वेळ कुठाय?

गांगुली : तुम्हाला कळणार नाहीत त्यांचे प्रॉब्लेम्स. शासन चालवायचं असतं त्यांना. वेट ॲन्ड वॉच...

पेंडसे : पण हे सायबर क्राइमवाले इतक्या झपाट्यानं आपलं जाळं पसरवतायत की त्याच गतीने जर आपण बदललो नाही तर जगाच्या विनोदाचा विषय ठरू आपण एक दिवस....

गांगुली : देअर इज अ पॉईंट इन व्हॉट यू से. बट वुई हॅव टू वेट... (दम देत) ॲन्ड नो आर्ग्युमेंट्स नाऊ...

पेंडसे : सॉरी सर!

गांगुली : (विषयावर येत) बाय द वे, कविता शर्माचं काय झालं?

पेंडसे : तपास सुरू आहे सर.

गांगुली : ॲण्ड शुभांगी बर्वे?

पेंडसे :  तपास सुरू आहे सर.

गांगुली : हे उत्तर देऊ मी मुख्यमंत्र्यांना?

पेंडसे : पण सर मला तर इथं येऊन फक्त दोनच महिने झालेयत. ट्रेण्ड माणसं नाहीत, इक्विपमेंट्स नाहीत. आपल्या वेबसाईटसाठी एक डेडिकेटेड सर्व्हर द्या म्हटलं तर तो मिळत नाही. सायबर क्राइम सेल गव्हर्नमेंटच्या वेबसाईटला जोडून ठेवलाय. पण सिक्युरिटीची काहीच व्यवस्था नाही तिथं. 'आव जाव घर तुम्हारा' अशी परिस्थिती आहे. एखाद दिवस कोणीतरी हॅक करील सगळं आणि अब्रूचे धिंडवडे निघतील तेव्हा डोळे उघडतील सरकारचे! कसं काम करायचं, आणि कसे रिझल्ट्स द्यायचे?

गांगुली : ग्रेटेस्ट डिस्कव्हरीज ऑफ द वर्ल्ड हॅव बीन मेड विदाऊट गूड इक्वीपमेंट ॲण्ड अण्डर ग्रेट डिफिकल्टिज् - विथ नोबडी टू एन्करेज...

पेंडसे : तुम्ही असं म्हणणार हे आधीच माहीत होतं मला.

गांगुली : (हसत) आय हॅव फूल फेथ इन यू मिस्टर पेंडसे... स्पेशली यूवर नॉलेज ॲण्ड ॲबीलिटी इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी.

पेंडसे : माझा वीक पॉईंट चांगला माहीत आहे साहेब तुम्हाला.

गांगुली : यू आर अॅन अप कमिंग स्टार ऑफ धिस डिपार्टमेंट, आय हॅव टोल्ड यू धीस सो मेनी टाइम्स...

पेंडसे : (हात जोडत) गोड बोलून काम कसं करून घ्यायचं ते तुमच्यापासून शिकावं साहेब.

गांगुली : (हसत) कविता शर्मा आणि शुभांगी बर्वे... रिझल्ट पाहिजे मला... (प्रश्नार्थक नजरेनं पाहतात. संगीत.)

पेंडसे : (विचारात पडून काही क्षणांनी) साधना ठाकूरच्या निमित्तानं या दोघींच्या प्रकरणांचा छडा लावू आपण असं वाटतंय मला सर...

गांगुली : यू मीन आणखी एक मुलगी?

पेंडसे : तसंच काहीसं प्रकरण... मला थोडी संधी द्या सर.

गांगुली : आर यू शुअर?

पेंडसे : (आत्मविश्वासाने) वाघाच्या तोंडाला माणसाच्या रक्ताची चटक लागली की तो पुन्हा माणसाच्या शोधात येतोच साहेब.....

गांगुली : (हसतात) ओके... गो अहेड ! मला हे माहीत होतं आणि म्हणूनच पुढच्या महिन्यात सिडनीला होणाऱ्या प्रशिक्षणासाठी निवड केलीय मी तुमची!

पेंडसे : (अविश्वासाने) रिअली सर?

गांगुली : ऑफकोर्स, इन फॅक्ट यू डिझर्व मोअर दॅन दॅट, लेट्स सी व्हॉट हॅपन्स नेक्स्ट...

पेंडसे : (उत्साहित) कोणत्या विषयावर प्रशिक्षण आहे सर?

गांगुली : डिजिटल ट्रॅफिक अॅनॅलिसीस अॅण्ड कॉम्प्युटर फॉरेन्सिक!

पेंडसे : (कृतज्ञतेने) आय अॅम सो ग्रेटफूल टू यू सर. ह्या विषयात जगभर काय चाललंय हे कळलं तर बऱ्याच गोष्टी सोप्या होतील आपल्यासाठी!

गांगुली : स्टेगॅनोग्राफीवरपण एक दिवसाचं चर्चासत्र ठेवलंय त्यांनी शेवटी.

पेंडसे : स्टेगॅनोग्राफी?

गांगुली : एक संदेशात लपवून दुसरा संदेश पाठवायचा... या करामतीला स्टेगॅनोग्राफी म्हणतात...

पेंडसे : आलं लक्षात साहेब... म्हणजे डी-कोडिंगचं नवं तंत्रही शिकायला मिळेल मला.

गांगुली : यू आर राईट!

पेंडसे : थँक्यू सर! थँक्यू व्हेरी मच! मला कधी वाटलं नव्हतं की एक दिवस प्रशिक्षणासाठी परदेशात जाण्याची संधी मिळेल म्हणून! (काही क्षण शांतता)

गांगुली : मिस्टर पेंडसे–

पेंडसे : येस सर?

गांगुली : मी इथं आलो होतो ते एका वेगळ्याच कामासाठी.

पेंडसे : (सावध होतात)

गांगुली : (सोबत आणलेली एक फाइल देत) ही फाईल घ्या, वाचा. सर्व डिटेल्स आहेत दिलेले.

पेंडसे : काय प्रकार आहे सर?

गांगुली : मुंबईला वीज पुरवठा करणाऱ्या एमएसईएस या कंपनीचे एम. डी. भेटून गेले कालच... देअर इज अ ड्रास्टिक डिक्लाइन इन देअर इलेक्ट्रिसिटी बिल्स... गेल्या महिन्यात ७५ लाख आणि त्या आधी सुमारे ९० लाख रूपयांचा घाटा आलाय त्यांना बिलांमध्ये...

पेंडसे : माय गॉड!

गांगुली : बाहेर कुणालाही कळलेलं नाही अजून. पत्रकारांना समजलं तर सरकारची लक्तरं काढतील ते.

पेंडसे : पण सर, मी... आय मीन... आपण मला...

गांगुली : येस... यू हॅव टू हँडल धिस केस.

पेंडसे : पण सर ही सायबर क्राइमची केस आहे असं वाटतं तुम्हाला?

गांगुली : ऑफकोर्स ! सेक्शन फॉर्टी थ्री ऑफ आय.टी. ॲक्ट टू थावजंड फाईव्ह... मे बी सेव्हन्टी... सेव्हन्टी टू... सेव्हन्टी फोर. सेक्शन फॉर्टी टू आणि सेव्हन्टी टू अमेंड झालेत नंतर, त्यांचाही नीट अभ्यास करा... एखादा तरी दगड नीट लागायला पाहिजे... काय? (हसत हसत निघण्यासाठी उठतात)

पेंडसे : पण सर मला, आय मीन हे काम मला एकट्याला...

गांगुली : आकाशात भरारी घेणारा गरूड एकटाच असतो... `इगल्स फ्लाय अलोन मिस्टर पेंडसे... (असं म्हणत गांगुली दारापर्यंत निघून परत येतात.) आय फरगॉट वन थिंग टू टेल यू !

पेंडसे : (चिंतेत) आता आणखी काय सर?

गांगुली : (सोबत आणलेलं एक छोटं पुडकं पुढं करीत) ही तुमच्यासाठी माझी एक छोटीसी भेट!

पेंडसे : (संकोच करत) पण सर...

गांगुली : घ्या, घ्या... इट्स माय ऑर्डर!

पेंडसे : (घेत) काय आहे सर?

गांगुली : हॅव अ लूक ॲट इट...

पेंडसे : (उघडून पाहात) ओह! सेल फोन? विश्वास बसत नाही साहेब...

गांगुली : (हसत) ब्लॅक बेरीचा आहे. सॉफ्टवेअर्स टाकलीत सगळी. सगळे प्रोग्राम्स टाकलेत. इंटरनेट आहे. एव्हरीथिंग इज देअर... जगाची एक छोटी प्रतिकृतीच समजा... काय?

पेंडसे : (उमजून) सर... परवा माझ्या मोबाईलची बॅटरी डाऊन झाली होती म्हणून... मला... सर... तुमच्याशी...

गांगुली : (हसतात) गुगल ॲलर्टस् सेट केलंय त्याच्यावर. सायबर क्राईममध्ये जगभर काय घडतंय त्याचे रिपोर्टस मिळत राहतील तुम्हाला वेळोवेळी... यू मस्ट बी अपडेटेड!

पेंडसे : मला लाजवताय तुम्ही सर...

गांगुली : कमॉन! तुमच्यासारख्या तरूण अधिकाऱ्यांच्या खांद्यावरच आहे आता या डिपार्टमेंटची भिस्त... आम्ही आज ना उद्या रिटायर होणार... माझ्या प्रेमाचं प्रतीक समजा पेंडसे... कर लो दुनिया मुठ्ठी मे! (हसत हसत निघतात, पेंडसे कृतज्ञतेने आणि भारावून पाय जुळवून खाड्कन सॅल्यूट मारतात. पेंडसे, त्यांना बाहेर सोडायला जातात. (संगीत) तोवर महाले हातात रिमोट घेऊन टीव्ही लावू लागतो. ते काम सुरू असताना त्याचे हांडेशी बोलणेही सुरू आहे.)

महाले : (भारावलेला) चॅयला काय भन्नाट माणूस हाय, नशीब म्हणून आपल्याला असा सीपी मिळाला...साहेबांवर खूप विश्वास आहे त्यांचा...

हांडे : हो.....हो... दिसलं ना आता.

महाले : पण एकदम गोडबोल्या माणूस आहे तो.

हांडे : असं का बोलतोस?

महाले : रात्रंदिवस कामं करावं लागणार आता आपल्याला. ती एम्‌एसईएसची नवी केस पण हाताळावी लागणार आपल्याला असं दिसतंय... ( टीव्हीवर चॅनल बदलता बदलता तो एका बातमीवर थांबतो. बातमी सुरू आहे–)

बातमी : एसेस्सीच्या बोगस गुणपत्रिका आणि प्रमाणपत्रं देणाऱ्या एका टोळीला आज औरंगाबाद येथे पोलिसांनी ताब्यात घेतलं. बोर्डाच्या बोगस गुणपत्रिका आणि

प्रमाणपत्रं बेकार तरूणांना विकली जात असल्याचं कारस्थान या प्रकरणामुळं उघडकीस आलं आहे. तशा तक्रारी प्राप्त झाल्या असता-

(बातमी चालू असतानाच पेंडसे आत येतात. त्यांच्या मागोमाग ठाकूरबाई. पेंडसेंना पाहून महाले टीव्हीचा आवाज कमी करतो. बातमी तशीच पुढे चालू राहते.)

पेंडसे : (ठाकूरबाईंना) बाहेरच का बसून राहिलात. आत नाही यायचं?

ठाकूर : तुमचे साहेब होते म्हणून...

पेंडसे : मग काय झालं? साहेब काय खातात आपल्याला? (महालेला) काय रे कसली बातमी आहे?

(महाले पुन्हा टीव्हीचा आवाज वाढवतो. पुढची बातमी ऐकू येऊ लागते.)

बातमी : (पुढे सुरू) आखाती देशात जाणाऱ्या बेकार तरूणांना ही प्रमाणपत्रं विकण्यात येत असल्याची माहिती पुढे आली आहे. या प्रमाणपत्रांच्या आधारे त्यांना मजुरीची कामं सुलभपणे मिळत असल्याचं सांगण्यात येतं. औरंगाबाद मोमीनपुऱ्यातील एका हॉटेलावर छापा घालून पोलिसांनी चार तरूणांसह त्यांच्याकडील संगणक आणि अन्य साहित्य ताब्यात घेतले. औरंगाबाद परीक्षेत्राचे पोलिस उपायुक्त -

पेंडसे : (महालेंकडून रिमोट काढून टीव्ही बंद करत.) चॅयला, हे प्रकार दिवसेंदिवस वाढतच जाणार! आणि लोक जोवर स्वत: शहाणे होत नाहीत तोवर आपलं काही खरं नाही. तिकडं अमेरिकेत नागरिकांची सायबर आर्मी उभारलीय सरकारनं, म्हणून चाललंय सगळं... (विषय बदलत, ठाकूरबाईंना) जाऊद्या बोला तुम्ही!

ठाकूर : काय बोलू साहेब ! तुम्हाला स्पष्टपणे सांगते, पण तुम्ही ज्या पद्धतीने लक्ष घालायला पाहिजे त्या पद्धतीने या प्रकरणात लक्ष घालत नाहीत असं माझं स्पष्ट मत झालंय.

पेंडसे : म्हणजे?

ठाकूर : महिना होत आला, अजून तुमच्याकडून काहीही हालचाल झालेली नाही.

पेंडसे : (चिडत) माझा सगळा स्टाफ तुमच्याच प्रकरणात गुंतलाय हे माहीत आहे का तुम्हाला?

ठाकूर : अहो, पण उपयोग काय त्याचा? तपासाचं राहोच उलट काल चोरी झाली आणखी घरात...

पेंडसे : चोरी?

ठाकूर : तेच तर सांगतेय मी.

पेंडसे : काय झालं नेमकं?

ठाकूर : चाळीस हजाराची कॅश गेली साहेब. एकत्र बांधून ठेवलं होतं बंडल.

पेंडसे : अरेरे!

ठाकूर : आणि दागिने जवळजवळ दोन अडीच लाखांचे होते! (हुंदका देते, हलकसं संगीत)

पेंडसे : हे बघा, रडू नका, कधी झाली चोरी नेमकी?
ठाकूर : काल सकाळी मी नेहेमीप्रमाणे भाजीपाला आणायला बाजारात गेले. माझ्या पाठोपाठ साधना कॉलेजला गेली.... घरी येऊन बघते तो हा प्रकार...
पेंडसे : घराचं कुलुप वगैरे काय तोडलं होतं का?
ठाकूर : नाही.
पेंडसे : खिड़की दरवाजाची काही मोडतोड झाली होती?
ठाकूर : नाही.
पेंडसे : सामानाची फेकाफेक?
ठाकूर : नाही.
पेंडसे : कपाट फोडलं होतं का?
ठाकूर : नाही.
पेंडसे : (मोठ्यानं हसतात)
ठाकूर : माझ्या जखमेवर मीठ चोळताय तुम्ही.
पेंडसे : ही आमची कामाची पद्धतच आहे.
ठाकूर : चोरी होऊ द्यायची, आणि चोराला शोधत न बसता वर हसत रहायचं ही तुमची कामाची पद्धत?
पेंडसे : साधना ठाकूर प्रकरणातली एकेक लक्षणं स्पष्ट व्हायला लागलीत आता. गुन्हेगाराला रेडहँडेड पकडू आपण काही दिवसांतच!
ठाकूर : काही दिवसातच!
पेंडसे : आणि तुम्हाला घाई झाली असली तर ऐका.... ही चोरी मुलीनंच केलीय तुमच्या. (संगीत)
ठाकूर : साधनानं?
पेंडसे : ऑफकोर्स! अंदाज चुकायचा नाही माझा!
ठाकूर : एखाद्याचा साधा पेन्सिलचा तुकडा दिसला तरी त्याला हात लावला नाही तिनं कधी आयुष्यात. अशी मुलगी स्वत: च्या घरात चोरी करील? काय सांगता तुम्ही?
पेंडसे : (झापत) हे बघा जास्त शहाणपणा करू नका. आणि मला अक्कल शिकवायची गरज नाही. घरात लक्ष द्यायला वेळ नाही तुम्हाला कुणालाच. पैसा खेळतोय ना घरात. फ्रीज, टीव्ही, व्हीसीआर, कॉम्प्युटर आणि ढुंगणाखाली गाडी आलीय प्रत्येकाच्या... रात्रंदिवस टीव्हीत तोंड खुपसून बसायचं आणि आईस्क्रीमपासनं बिर्याणीपर्यंत प्रत्येक गोष्ट होम डिलिव्हरीनं मागवायची! एक सो कॉल्ड नवश्रीमंत वर्गच उदयाला आलाय आपल्याकडं... क्रेडिटकार्डवाला... इंटरनेटवरनं ऑर्डर देऊन पिझ्झा मागवितात भडविचे. पोरं फिरताहेत बाहेर नको ते धंदे करत. तुमच्या पोरांवर लक्ष ठेवायला पोलिस डिपार्टमेंट म्हणजे काय पाळणाघर वाटलं तुम्हाला?
ठाकूर : (नरम पडत) मला तसं म्हणायचं नव्हतं साहेब.
पेंडसे : (दमात घेत) मी तुम्हाला म्हटलं होतं की कॉम्प्यूटर शिकून घ्या!
ठाकूर : शिकले साहेब.
पेंडसे : काय काय शिकलात?
ठाकूर : स्टार्ट, शट डाऊन, डॉक्युमेंट- फाइल, फोल्डर तयार करणे, इंटरनेट, ई मेल...

पेंडसे : वा वा! व्हेरी गूड! (कॉम्प्यूटरकडे निर्देश करत) या, बसा आता इकडं. (त्या कॉम्प्यूटरवर बसतात आणि पेंडसेंच्या आदेशाप्रमाणे काम करू लागतात. संगीत येते.) घ्या कनेक्शन... हॉटमेल ओपन करा... ओके... आता त्या बॉक्समध्ये युझर आयडी टाका.... (मागच्या पडद्यावर ते सारं काम दिसू लागतं)

ठाकूर : कोणता साहेब?

पेंडसे : करा टाइप मी सांगतो तसं! (एकेक अक्षर सांगू लागतात) वि ज य कु मा र ठा कू र.

ठाकूर : (गोंधळून) म्हणजे साहेब...

पेंडसे : नवरा तुमचा, दुसरं कोण?

ठाकूर : पण साहेब, पासवर्ड माहीत नाही मला त्यांचा...

पेंडसे : थोडा कॉमनसेन्स असला की झालं, लागतं काय त्याला... नाव टाइप करा आधी.

ठाकूर : (टाइप करते, विचार करत) विजयकुमार ठाकूर.

पेंडसे : गूड, आता करा टाइप - व्ही के टी - एंटर... (टाईप करून एन्टर करत)

ठाकूर : रॉंग पासवर्ड...

पेंडसे : जन्मतारीख काय त्यांची?

ठाकूर : १५ ऑक्टोबर.

पेंडसे : करा टाइप - व्ही के टी फिप्टीन ओसीटी - एंटर!

ठाकूर : (एन्टर करत) रॉंग पासवर्ड साहेब.....

पेंडसे : गाव कोणतं त्यांचं?

ठाकूर : नाशिक, साहेब.

पेंडसे : करा टाइप - व्ही के टी एनएसके - करा एंटर

ठाकूर : (एन्टर करत) रॉंग पासवर्ड...

पेंडसे : ओके... (विचार करत) तुमचं नाव वैशाली ना?

ठाकूर : हो साहेब.

पेंडसे : ओके... करा टाईप-व्ही फॉर विजयकुमार, एस फॉर साधना, टी फॉर ठाकूर... करा टाईप, ओके? करा एण्टर! (ती करते. पण ओपन होत नाही.)

पेंडसे : नाही होत ओपन? (मदतीला बोलवत) महालेऽऽऽ

महाले : येस सर!

पेंडसे : काय वाटतं तुला?

महाले : प्रयत्न करून बघतो सर! ( उत्साहाने ठाकूरबाईना) 'फरगॉट द पासवर्ड'वर क्लिक करा. (त्या तसं तसं करत जातात)

महाले : काय आलं... वाचा!

ठाकूर : व्हॉट इज माय फेवरीट कलर?

महाले : आवडता रंग कोणता त्यांचा? माहिती आहे का?

ठाकूर : (विचार करत) गुलाबी!

महाले : म्हणजे पिंक! टाइप करा. पी आय एन के, पिंक! (त्या टाईप करतात)

महाले : एण्टर!

(ठाकूरबाई एण्टर करतात आणि एकदम पासवर्ड दिसतो. पेंडसे, महाले, हांडे खुशीनं हसतात.

पेंडसे : (महालेची पाठ थोपटतात) वा! कमाल केलीस तू! बघ काय पासवर्ड आहे? (स्वतःच वाचत) व्ही व्ही एस टी–

पेंडसे : (विचार करत) व्ही व्ही एस टी? वैशाली... विजयकुमार... एस फॉर साधना आणि टी फॉर ठाकूर ... व्ही व्ही एस टी! म्हणजे मघाशी आपला एक व्ही राहिला होता, काय? (सगळे हसतात) वण्डरफुल! ( ठाकूर बाईना) पासवर्ड शोधून काढायला काही जास्त अक्कल लागत नाही सांगितलं ना तुम्हाला आत्ताच! आणि आपला नवशिका मराठी माणूस तर त्याच्या एनिशिएल्सच्या पुढे जायला तयार नाही. फार फार तर जन्म तारीख किंवा साल टाकणार मागं पुढं... आपल्याकडं ९५ टक्के लोकांचे पासवर्ड त्यांच्या फॅमिली डिटेलशी संबंधित असतात. वाचा आता एकेक मेल उघडून (स्वतःच एक मेल उघडून देतात) हे घ्या... घ्या ... वाचा... आम्हालापण ऐकू दे जरा... ठाकूर: (एकेक शब्द वाचत) एलिफंटा इज कॉलिंग अस... मीट ऑन मंडे -

पेंडसे : (हसत मोठ्याने) एलिफंटा इज कॉलिंग अस... मिट ऑन मंडे... महालेऽऽऽ

महाले : येस सर !

पेंडसे : कुणी पाठवलाय बघ बरं.

महाले : (पहात) सीमा एवढंच लिहिलंय तिथं...

पेंडसे : सीमा... ( परत हसतात)

ठाकूर : म्हणजे काय साहेब?

पेंडसे : दुसरं काय? एलिफन्टा हाकारतोय आपल्याला, सोमवारी तिथंच भेटूया लाडके... सीमा नावाच्या बाईबरोबर फिरतोय तुमचा नवरा... नादाला लागलाय तिच्या... (ठाकूरबाई अस्वस्थ. पेंडसे टेबलावरचा पाण्याचा ग्लास उचलून ठाकूरबाईंना देतात) घ्या, प्या. (की-बोर्ड ताब्यात घेत) आता त्यांच्या सेंट मेसेजेस मध्ये जाऊ आपण... (क्लिक करत) हे बघा... वाचा, तुमच्या नवऱ्यानं तिला पाठवलेले मेसेजेस. वाचा, वाचा! ऐकू दे आम्हालापण!

ठाकूर : (वाचत) यू लूक ब्युटीफूल इन ग्रीन सारी... डिड यू लाइक द डायमंड रिंग? (उपरोधाने) हिरव्या साडीत छान दिसतेस लाडके, हिऱ्याची अंगठी आवडली ना?

ठाकूर : (गोंधळात पडलेल्या) काहीच समजत नाही साहेब. काय आहे हे?

पेंडसे : सोमवारी एलिफंटाला जा आणि तिथं समक्षच बघा काय चाललंय ते.

ठाकूर : पण सोमवारी तर ऑफिस असतं त्यांचं...

पेंडसे : तुम्हाला कसं सांगू ठाकूरबाई, सगळं जग बदललं पण वडाला फेऱ्या मारणारी आपली मराठी बाई काही बदलायला तयार नाही. नवऱ्याचा शब्द म्हणजे ब्रह्मवाक्य वाटतं तिला. (हसतात) ऑफिसच्या नावाखाली वाट्टेल ते धंदे करत बाहेर फिरतोय तुमचा नवरा!

ठाकूर: (अस्वस्थ, घायाळ.)

पेंडसे : (आणखी संदेश पाहात–) आणि हे पहा त्यांच्या मित्रानं त्यांना परदेशातून पाठवलेली खास भेट... बघा-बघा... (उत्तेजक संगीत. अंधार होऊ लागतो. आता मेलमध्ये पाश्चात्य महिलांची अर्धनग्न, मादक, उत्तेजक, अश्लील छायाचित्रं येऊ लागलेली. त्यातील काही मागील स्क्रीनवर दिसू लागतात. ती पाहून ठाकूर बाई एकदम हादरून जातात. ओंजळीत चेहेरा लपवतात) नको नको, प्लीज... काही दाखवू नका आता... पाहवत नाहीत हे फोटो... प्लीज... बंद करा हा प्रकार... प्लीज...

पेंडसे : बघायला काय हरकत आहे? बघा की ! जीवनात चांगलं आणि वाईट असं काही नसतं. अश्लीलता ही बघणाऱ्याच्या नजरेत असते ठाकूरबाई!
ठाकूर : प्लीज थांबवा... बंद करा ते... प्लीज... (पेंडसे ती मेल बंद करतात, हळू हळू प्रकाश येऊ लागतो. शांतता)
पेंडसे : तुमच्याकडून ती हार्ड डिस्क घेऊन आलो आणि रात्रभर मी आणि वझे त्यात डोकं घालून बसलो. महानगरपालिकेचे सफाई कामगार जसे गटारात शिरून सगळी घाण साफ करतात ना, तोच उद्योग केला आम्ही रात्रभर... मुलीवरच्या संकटाचा शोध घ्यावा म्हणून आत गेलो तर बापाचे प्रताप हाती आले...
ठाकूर : (उद्ध्वस्त) आयुष्यात असं अचानक एखाद्या अवघड वळणावर येऊन उभं रहावं लागेल असं कधी स्वप्नातसुद्धा वाटलं नव्हतं. नाकासमोर चालण्यात धन्यता मानण्यात अनेक पिढ्या गेल्या आमच्या. पण ज्याला देव मानून रोज पूजा केली आणि ज्याच्या खांद्यावर विश्वासानं मान टाकली त्या नवऱ्यानं पाठीत सुरी खुपसली... कोणतं पाप केलं होतं मी साहेब? कशासाठी जगू मी आता? कुणासाठी जगू? (रडू लागतात)
पेंडसे : शांत व्हा ठाकूरबाई, शांत व्हा. माझ्यावर विश्वास ठेवा. मी आहे तुमच्याबरोबर. अख्खं पोलिस डिपार्टमेंट उभं आहे तुमच्या पाठीशी. आणि एक लक्षात घ्या, अशा प्रकारच्या अडचणीत सापडलेल्या तुम्ही काही एकट्याच नाही आहात. प्रत्येक घराच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलंय हे संकट आज. आपल्याला एकत्र येऊन लढायचंय त्याच्याशी. धीर सोडू नका, सारी शक्ती एकवटून उभ्या रहा... आत्ता इथं हे जे घाणेरडे फोटो तुम्ही पाहिलेत ना, तिथं कदाचित उद्या तुम्हाला तुमच्या मुलीचे- (कठोर होत) साधनाचे फोटो पहावे लागतील (ठाकूरबाईंचा मोठा हुंदका) भावनावश होऊन हा प्रश्न सुटणार नाही. वास्तवाला शांतपणे सामोरं जाण्याची तयारी ठेवा. साधनाला वाचवायचीय ना या संकटातनं?
ठाकूर : हो साहेब.
पेंडसे : आणि नवऱ्यालाही वठणीवर आणायचंय नां?
ठाकूर : हो साहेब.
पेंडसे : मग स्वत:ला सावरा, मन खंबीर करा. कविता शर्मा आणि शुभांगी बर्वे यांच्या घरात जे घडलं ते तुमच्या घरात घडू द्यायचं नाही मला.
ठाकूर : पण साहेब, या असल्या घाणेरड्या कारस्थानात खरंच सापडलीय का माझी मुलगी?
पेंडसे : साधनाचा ई-मेल अकाऊंट दररोज चेक करतोय आम्ही.काही धागेदोरे हाताशी आलेयत, त्याआधारे गुन्हेगारापर्यंत पोहोचू शकतो आपण. माझ्यावर विश्वास ठेवा तुम्ही.
ठाकूर : तिच्या जीवाला काही धोका तर नाहीना साहेब? कोणते धागेदोरे म्हणताय तुम्ही?
पेंडसे : (संदेश म्हणून दाखवत) 'कम विथ मनी, आय ॲम इन रेड शर्ट, वन वन एट प्लीज... पीकेपी, एचएमटी... इंडियन...
ठाकूर : (गोंधळलेल्या)
पेंडसे : (मोठ्याने हसत) तुम्हाला कळणार नाही ते ! ११८चा बसस्टॉप तुमच्या एरियातच आहे ना?
ठाकूर : हो साहेब, दोन सिग्नल सोडले की राईटला... याच बसनं जाते साधना कॉलेजला. पण का साहेब?
पेंडसे : मी तुम्हाला आधीच सांगितलय की, काहीही काळजी करू नका. यू आर इन सेफ हँड्स. उद्या घरी येतोय आम्ही तुमच्या... दुपारी दोन वाजता. पण घरात कुणाला कल्पना द्यायची नाही, ओके?
ठाकूर : हो साहेब.

पेंडसे : या आता!

(ठाकूरबाई जातात. पेंडसेंचा मोबाईल वाजतो.)

पेंडसे : हॅलो, परदेशी! शंभर वर्ष आयुष्य आहे तुम्हाला. पण म्हणून शंभर वर्ष मोहिमेवर राहू नका, काय? (हसतात) आँ? काय? अहो, आपली नाचक्की होईल अशानं जगात. रसाळ आणि काकडेसुद्धा कामगिरीवर आहेत हे माहिताय मला पण मला खरी अपेक्षा आहे ती तुमच्याकडून... प्रयत्न? अरे कसले प्रयत्न करताय? मुंबईतल्या प्रत्येक घरातली एकेक मुलगी जीवानिशी जावी अशी इच्छा आहे का तुमची? आय नो दॅट व्हेरी वेल! गिअर अप करा... मला रिझल्ट पाहिजे... येस येस... रेड शर्ट... येस, रेड शर्ट... आणि ११८चा बसस्टॉप... अहो माहिताय मला, गिरगाव ते माहीम असून असून किती बसस्टॉप असतील? वीस-पंचवीस-तीस.... काहीही कन्फ्यूजन नाही त्यात... मी हे दोन्ही मेसेजेस फॉर्वर्ड केलेत तुमच्या ॲड्रेसवर, ओके?

(क्षणभर अंधार. बेस्ट बसेसचे आवाज. ट्राफिकचा गोंधळ, फेरीवाल्यांचे कर्णकटू आवाज, मग हळू हळू शांतता. पुन्हा प्रकाश. पेंडसे कॉम्प्यूटरवर बसून काही काम करीत आहेत. बाहेर एकदम आरडाओरडा होतो.)

(विंगेतून आवाज...

महाले : चल चल साला, श्याणपणा शिकवू नको... चल नीट !

प्रसाद : पण जबरदस्ती काय चाललीय तुमची, मी येतोय ना?

महाले : जास्त आवाज करायचा नाय, चल हो आत. हो आत म्हणतो ना! मला श्याणपणा शिकवतोय साला...)

(महाले लाल शर्टातल्या एका कॉलेज कुमाराला कॉलरला धरून आत आणतो आणि पेंडसेंच्या समोर ढकलून देतो. हा प्रसाद काळे. तोंडात च्युइंगगम, पाठीला टिपीकल सॅक, कानात ईयरफोन, मोबाईलवरची गाणी ऐकण्यासाठी)

प्रसाद : (चिडलेला) काय चाललयं काय तुमचं? मी काही कोणी चोर, दरोडेखोर नाही. (पेंडसेंना ) हे बघा साहेब, मी यांना सारखं विचारतोय माझा गुन्हा तरी काय? तर काही बोलायला तयार नाहीत. काय प्रकार आहे हा? कॉलेजात शिकतो मी, काही गुंड मवाली नाही!

पेंडसे : अरे हा तर चांगल्या सुसंस्कृत घरातला मुलगा दिसतोय, कशाला आणलंस बिचाऱ्याला. काय केलं त्यानं?

प्रसाद : तेच विचारतोय साहेब मी त्यांना मघापासनं. बसस्टॉपवर उभा राहणं हा गुन्हा आहे का?

पेंडसे : अगदी खरंय तुझं म्हणणं. राहतोस कुठं?

प्रसाद : होस्टेलला राहतो साहेब, चर्च गेट, बी- रोड.

पेंडसे : गूड, शिकतोस कुठं?

प्रसाद : माहीमला, इंजिनियरिंग कॉलेजात सेकंड इयरला आहे मी साहेब.

पेंडसे : नाव काय म्हणालास?

प्रसाद : (खोट बोलत) संतोष भिलवडीकर.

पेंडसे : गाव?

प्रसाद : वाळवा, जिल्हा सांगली.

पेंडसे : (तिरकसपणे) म्हणजे इंजिनियर होऊन राजकारणात प्रवेश करणार असशील...

प्रसाद: (मोकळेपणाने हसत) यू हॅव अ ग्रेट सेन्स ऑफ ह्युमर, साहेब... पण मला काय राजकारणात वगैरे इंटरेस्ट नाही.

पेंडसे : (थोडं कठोर होऊन मुद्यावर येत) साधना ठाकूरला ओळखत असशीलच!

प्रसाद : कोण?

पेंडसे : साधना ठाकूर!

प्रसाद : (गोंधळून) काय कल्पना नाही आपल्याला...

पेंडसे : तुमच्याच कॉलेजात शिकते ती...

प्रसाद : काय साहेब, इतक्या मुली आहेत आमच्या कॉलेजात, त्यातनं नेमकं कसं लक्षात ठेवायचं, एखाद्या मुलीचं नाव?

पेंडसे : स्कॉलर आहे म्हणून विचारलं, एक्स्ट्रा करिक्युलर अॅक्टिव्हिटिज मध्ये असते सगळीकडे.

प्रसाद : सिनिअरला असेल कदाचित, पण कधी नाव ऐकल्याचं आठवत नाही.

पेंडसे : बरं, पी. के. पी. ला ओळखतोस?

प्रसाद : कोण पी.के.पी?

पेंडसे : एच.एम.टी.?

प्रसाद : 'हिन्दुस्थान मशीन टूल्स म्हणायचंय का तुम्हाला?

पेंडसे : नाही रे बाळा, टोपणनाव आहे 'एचएमटी' हे...

प्रसाद : मला कसं माहीत असणार साहेब?

पेंडसे : बरं, 'इंडियन'?

प्रसाद : इंडियन? काय चाललंय काय साहेब तुमचं हे? फिरकी ताणताय तुम्ही माझी. माझ्या कशी लक्षात राहतील लोकांची नावं?

पेंडसे : ज्याला आपलं स्वत:चं नाव नीट लक्षात रहात नाही त्याच्या लक्षात इतरांची नावं राहणार तरी कशी?

प्रसाद : म्हणजे साहेब?

पेंडसे : (खाड्कन त्याच्या थोबाडीत मारतात तो कोलमडतो, पुन्हा सावरतो, गालावर हात चोळत भेदरून पाहतो) ओठ पिळले तरी दूध निघेल अजून एवढं कमी वय आहे तुझं. माझ्याशी खोटं बोलतोस? (त्याच्या खिशातून पाकिट काढत) आयकार्ड बघू तुझं?(आयकार्ड काढून नाव वाचत) प्रसाद काळे! (त्याला) हा फोटो तुझा ना?

प्रसाद : हो साहेब.

पेंडसे : मग संतोष भिलवडीकरचा एकदम प्रसाद काळे कसा झाला? (त्याला आणखी एक झापड मारतात. तो कोलमडून खाली पडतो आणि पुन्हा थरथरत उभा राहतो)

पेंडसे : गाव कुठलं तुझं?

प्रसाद : पुणे साहेब.

पेंडसे :  (आयकार्ड पाहून कन्फर्म करून घेत–) ११८ च्या बसस्टॉपवर काय करत होतास? भेटायला बोलवलं होतंस का कुणा मैत्रिणीला? का सावज हेरलं होतंस एखादं? बोल की रे भडवीच्या, आता गप का? पोलिसांना काहीच अक्कल नाही असं वाटतं का तुला?

हांडे : (तापत) साहेब याला आत घेतो आणि नागडा करून चटके देतो गांडीवर!

पेंडसे : (हसत) तुला सांगितलं होतं पहिल्याच दिवशी? डोक्यानं काम करायचं इथं... एक झापड चिक्कार झाली याच्यासाठी ! ( समीकरण जुळवत) प्र-सा-द काळे, पुणे. पी फॉर प्रसाद, के फॉर काळे, पी फॉर पुणे - पीकेपी- येस, पीकेपी... हे टोपण नाव तुझंच ना?

प्रसाद : (खोटं बोलत) नाही साहेब.

पेंडसे : (हाक मारत) महालेऽऽऽ

महाले : येस सर.

पेंडसे : (त्याच्याकडं आयकार्ड देत) पुण्याला याच्या घरी फोन लाव. याच्या बापाशी बोलतो मी.

प्रसाद : (पेंडसेंच्या पायावर पडतो) माझी चूक झाली साहेब, मी माफी मागतो, मला काय हवं ते करा पण माझ्या घरी काही सांगू नका साहेब.

पेंडसे : का सांगू नका घरी?

प्रसाद : माझे वडील हार्टपेशंट आहेत साहेब.

पेंडसे : काय काम करतात ते?

प्रसाद : काही नाही साहेब, भिक्षुकी करतात.... कसंबसं घर चालतं आमचं. (भावविवश होत) माझ्याकडून फार अपेक्षा आहेत साहेब त्यांच्या... त्यांना काही सांगू नका, प्लीज... जीव जाईल साहेब त्यांचा... (रडू लागतो)

पेंडसे :  मग बोल आता पटापट... हा पी के पी कोण?

प्रसाद : (त्याचा धीर सुटतो) माझी चूक झाली साहेब. मला माफ करा साहेब, अशी चूक पुन्हा करणार नाही साहेब.

पेंडसे : साधना ठाकूरला पीकेपी या टोपण नावाने घाणेरडे संदेश पाठवणारा तूच?

प्रसाद : (होकारार्थी मौन)

पेंडसे : (त्याला त्याच्या संदेशाची आठवण करून देत) 'आय वॉन्ट टू प्ले क्रिकेट विथ यू... आय हॅव ए बॅट, यू कम विथ बॉल्स... वा: काय प्रतिभाशक्ती आहे रे तुझी?

प्रसाद : (हात जोडत) चूक झाली साहेब.

पेंडसे : ज्या पुण्यात परम महासंगणकाची निमिर्ती करणारा विजय भटकरांसारखा दिग्गज जन्माला आला तिथंच तुझ्यासारखा भगेंद्रही निर्माण व्हावा हा महाराष्ट्राचा केवढा मोठा दैवदुविर्लास रे बाळा! (तो खजील. दुसऱ्या एका संदेशाची आठवण करून देत) 'कम विथ मनी, आय ॲम इन रेड शर्ट? (प्रश्नार्थक मुद्रेनं पाहतात)

प्रसाद : म्हणजे काय ते मला माहीत नाही साहेब.

पेंडसे : पैसे घेऊन बोलवलं होतंस तू तिला? ब्लॅकमेल करत होतास?

प्रसाद : आईशप्पथ साहेब, असं काही करत नव्हतो मी. माझा नाही तो संदेश.

पेंडसे : मग हा लाल शर्ट?

प्रसाद : माझा आवडता रंग आहे हा, लहानपणापासून.

पेंडसे : मग तो संदेश कुणाचा? कम विथ मनी, आय ऍम इन रेड शर्ट?

प्रसाद : सांगितलं ना साहेब, मला खरंच माहीत नाही. आणि या लाल शर्टामुळे जर तुम्हाला जर माझा संशय आला असेल तर यापुढे लाल शर्टच काय पण लाल
रूमालसुद्धा वापरणार नाही कधी.

पेंडसे : आणि हा आधीचा संदेश?

प्रसाद : तो मी पाठविला होता साहेब...
पेंडसे : कितीजण आहेत तुझ्या टोळीत?
प्रसाद : टोळी नाही साहेब, मी आणि माझा एक मित्र...
पेंडसे : कोण? काय नाव त्याचं?
प्रसाद : टोपे.
पेंडसे : संपूर्ण नाव?
प्रसाद : हेमंत मानसिंगराव टोपे.
पेंडसे : हेमंत मानसिंगराव टोपे (विचार करत) म्हणजे एच.एम.टी. बरोबर ना?
प्रसाद : हो साहेब.
पेंडसे : मग 'इंडियन' कोण हेही माहित असेल तुला.
प्रसाद : मला माहीत नाही साहेब, मला सोडून द्या साहेब, मी चुकलो साहेब...
पेंडसे : साधनाला ब्लॅकमेल करत होतास की नाही तू?
प्रसाद : नाही साहेब.
पेंडसे : तिच्याकडून पैसे घेत होतास की नाही ?
प्रसाद: आई शप्पथ सर, असं काही करत नव्हतो मी.
पेंडसे : `माझी होशील का?' हा उद्योग तुझाच ना? (तो पेचात) बोल, आता जर खरं बोलला नाहीस तर मात्र या हांडेच्या ताब्यात देतो तुला. चामडी सोलून काढील तो तुझी. (हांडे अ‍ॅलर्ट होतो)
प्रसाद: (टरकत) हो साहेब, मीच तो संदेश तिच्या घरच्या फोनवर मॅनेज केला होता....
पेंडसे : शाब्बास! ती करामत कशी केलीस तू?
प्रसाद : नेटवरून एमटीएनएलचा प्रोग्रॅम मिळवला साहेब, सोर्स कोड शोधून काढला, सगळी डिझाईन डॉक्युमेंटस् मिळवली... एका मित्राकडनं तो मेसज वाचून घेतला आणि ती फाईल एक्सचेंजमध्ये तिच्या नंबरला अ‍ॅटॅच केली...
पेंडसे : वा ! पण कारण काय? का त्रास देत होतास तिला?
प्रसाद : (गप्प)
पेंडसे : बोल की !
प्रसाद : माझं प्रेम होतं साहेब तिच्यावर. फर्स्ट इयरला आम्ही बरोबरच होतो. एकत्रच अभ्यास करायचो. फिरायला जायचो. कधी सिनेमाला जायचो, पण हळूहळू मला वाईट मित्रांची संगत लागली... वाढत गेली. सिगरेटी ओढणं, पत्ते खेळणं, बीयर पिणं, पिरियडला दांड्या मारणं, पोर्नोग्राफी पहाणं नेहमीचं झालं ... मी त्या मुलांच्यात अडकत गेलो. नापास झालो. पैसे पुरेनात म्हणून नको त्या गोष्टी सुचायला लागल्या. साधना मात्र पुढं गेली. मला ती कोणताच प्रतिसाद देईना. भेटली तरी ओळख दाखवेना म्हणून मी चिडलो आणि तिचा सूड घेण्यासाठी ई - मेल वरून तिला हैराण करणं सुरू केलं. घाणेरडे संदेश पाठवायला लागलो. मी वाईट वागलो साहेब, पण माझा तसा उद्देश कधीच नव्हता. मला सोडून द्या साहेब, प्लीज... मी चांगला वागेन साहेब ... प्लीज... विश्वास ठेवा माझ्यावर साहेब...
पेंडसे : अगदी मनापासून बोलतोयस तू हे?
प्रसाद : हो, अगदी खरं साहेब. आईची शप्पथ साहेब!

पेंडसे : 'इंडियन' कोण, हे तुला माहीत नाही?

प्रसाद : (विचार करत) थोडं थोडं आठवतंय...

पेंडसे : काय आठवतंय, बोल लवकर.

प्रसाद : माझ्या अकाऊंटवर अधुनमधून एक मेल येत असते. ती पाठवणाऱ्याचं नाव इंडियन असावं असं वाटतंय, (आता नीट आठवतं.) येस, आठवतंय मला, नक्की!

पेंडसे  : (एका वेगळ्याच आनंदाने) आर यू शूअर?

प्रसाद : हंड्रेड परसेंट.

पेंडसे : काय असतं रे त्या मेलमध्ये?

प्रसाद : (आठवत) काहीतरी, तरूणांना नोकऱ्या देणारी कंपनी आहे ती!

पेंडसे : नाव काय कंपनीचं? आठव... आठवण्याचा प्रयत्न कर (संगीत)

प्रसाद : आठवलं सर...

पेंडसे : काय, बोल!

प्रसाद : (त्याला आठवतं) येस... बी.पी.सी.आय.

पेंडसे : म्हणजे?

प्रसाद : येस.... बिझी पीपल्स कार्पोरेशन इंटरनॅशनल.

पेंडसे : आर यू शुअर?

प्रसाद : येस सर!

पेंडसे : (मोठ्यानं हसत प्रसादला जवळ घेतात. त्याच्या पाठीवरून हात फिरवतात. तो डोळे पुसतो) हे बघ प्रसाद, तू चांगल्या घरातला मुलगा आहेस... बुद्धिमान आहेस, मनात आणलंस तर नक्की सुधारू शकतोस तू... नव्यानं आयुष्य सुरू करून यशाच्या शिखरावर पोहोचू शकतोस.... तशी संधी तुला द्यायची असं ठरवलंय मी.

प्रसाद : (त्यांच्या पाया पडत) थँक्यू सर, मी तुमचे उपकार कधी विसरणार नाही.

प्रसाद : : मी तुला सोडतो पण माझ्या दोन अटी आहेत.

प्रसाद : कोणत्या साहेब?

पेंडसे : ठाण्याला आनंद नाडकर्णी म्हणून डॉक्टर आहेत... माझा मित्र आहे.... डी- ॲडिक्शन सेंटर चालवतात ते... त्यांना भेटायचं... माझं नाव सांगायचं... (पाकिटातून कार्ड काढून देत) हे त्यांचं कार्ड...

प्रसाद : (घेत) हो साहेब...

पेंडसे : भारतातले द बेस्ट काऊंसेलर आहेत ते, त्यांच्याशी सविस्तर बोलायचं, त्यांचं मार्गदर्शन घ्यायचं. उपचार घ्यायचे. ते वाचायला पुस्तकं देतील, डोकं ठिकाणावर ठेवून कसं जगायचं शिकवतील, अभ्यास कसा करायचा हे शिकवतील... मी बोलतोय त्यांच्याशी, ओके? (प्रसाद हो सर म्हणतो) आता दुसरी अट... तू एमटीएनएलची साईट हॅक केलीस, बरोबर?

प्रसाद : हो साहेब.

पेंडसे : मग आता तसंच ह्या 'बीपीसीआय' च्या मागं लागायचं. हा ‘इंडियन’ कोण ते शोधून काढायचं. आणि त्याचा ठावठिकाणा समजला की मला येऊन भेटायचं?

प्रसाद : जमेल सर!

पेंडसे : ओके... मला तुझ्याकडून हीच अपेक्षा होती. विश यू ऑल द बेस्ट.
(प्रसाद थँक्यू म्हणून निघून जातो. पेंडसे महालेला)
पेंडसे : महालेऽऽऽ
महाले : येस सर?
(प्रसाद गेला त्या दिशेला बोट करत कठोरपणे) आजपासून या भडव्याच्या पाळतीवर राहायचं...
महाले : काय सर?
पेंडसे : (चिडत) कानाची भोकं झाली का तुझ्या ? आजपासून याच्या पाळतीवर राहायचं, समजलं?
महाले : पण सर आत्ताच तर तुम्ही त्याला....
पेंडसे : जास्त शहाणपणा करू नको, ढुंगणावर पाणी घालायला सांगितलं की घालायचं, लोंबतय काय ते विचारायचं नाही !
महाले : (सॅल्यूट ठोकत ) यस सर!
पेंडसे : जा आणि एक कडक चहा पाठवून दे इकडं... (फोन वाजू लागतो) फोन कुणाचा वाजतोय बघ आधी.
महाले : (धावत जाऊन फोन घेतो) हॅलोऽऽऽ हां... हां... हो... हो... एक मिनिट हं साहेब. (माऊथपीसवर हात ठेऊन) सर परदेशी...
पेंडसे : त्याला म्हणावं साहेब कामात आहेत, नंतर फोन कर.
महाले : (फोनवर ) साहेब आता जरा अर्जंट कामात आहेत, थोड्या वेळानं फोन करायला सांगितलंय... काय म्हणालात? हां बोला... बोला... (थोडा वेळ ऐकून माऊथपीस वर हात ठेऊन पेंडसेंना ) साहेब त्यांचा एक महत्त्वाचा निरोप आहे...
पेंडसे : कसला निरोप?
महाले : ते म्हणतायत की प्रिन्सेस स्ट्रीटला ११८ च्या बसस्टॉपवर लाल शर्ट घातलेला एक माणूस उभा आहे, त्याला घेऊन येऊ का?
पेंडसे : (उठत आश्चर्याने) काय - लाल शर्टातला माणूस? (ते धावत जाऊन फोन घेतात आणि त्यावर बरेच काही बोलू लागतात. पण त्यांच्या फक्त ओठांच्या हालचाली आणि हातवारे दिसत आहेत. हळूहळू अंधार होऊ लागतो. गाणे ऐकू येऊ लागते.)
: जगणे म्हणजे, सुरेल गाणे
सुख दु:खाचे धुंद तराणे
चला भिडूया आव्हानांना
करुया थोडी मस्ती, डोन्ट वरी बी हॅपी!
(हळूहळू पडदा.)

## मध्यंतर

***

(या नाटकाची पूर्ण संहिता ज्यांना हवी असेल त्यांनी संकेतस्थळी दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा.

या नाटकाचे प्रयोग, भाषांतर-रूपांतर, त्यावर आधारित दूरदर्शन मालिका, चित्रपट, टेलिफिल्म यासारख्या अन्य माध्यमातील रुपांतरासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. या नाटकातील कोणताही भाग, मुद्रित वा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमात कोणत्याही पद्धतीने वापरावयाचा झाल्यास त्यासाठीही लेखकाची पूर्व-परवानगी घ्यावी.)

***